मंगळवार, २ एप्रिल २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २१८
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 2 APRIL 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-218 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05



# नीलेश लंके इथल्या लोकांचा आवाज दिल्लीपर्यंत पोहोचवतील

## जयंत पाटील : मोहटादेवीचे आशीर्वाद घेत फोडला प्रचाराचा नारळ

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीकांत चौरे**

**अहमदनगर : लोकांनी उमेदवाराला खांद्यावर घेतले आणि निवडणूक लोकांनी हातात घेतली तर कोणतीही शक्ती त्या उमेदवाराचा पराभव करू शकत नाही. निलेश लंके हे स्थानिक आहेत, लोकप्रिय आहेत, सतत फिरतीवर असतात. त्यांच्या विधानसभा मतदारसंघात त्यांनी प्रचंड काम केले आहे आणि लोकप्रतिनिधी कसा असावा याचा आदर्श त्यांनी घालून दिला आहे. या लोकसभा मतदारसंघातील अनेक प्रश्न सुटलेले नाहीत त्यामुळे हा उमेदवार आपण पुढे केला आहे. लंके इथल्या लोकांचा आवाज दिल्लीपर्यंत पोहोचवतील, असा विश्वास प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी व्यक्त केला.**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे व इंडिया आघाडीचे अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार नीलेश लंके यांनी सोमवारी पाथर्डी येथे मोहटादेवीचे आशीर्वाद घेत आपल्या प्रचाराचा नारळ फोडला. स्वाभिमानी जनसंवाद यात्रेच्या माध्यमातून नीलेश लंके आपला प्रचार करणार आहेत. या यात्रेचाही प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत शुभारंभ झाला. यावेळी पुढे बोलताना पाटील म्हणाले की, आज देशात अनेक प्रश्न प्रलंबित आहेत तरी काही जण म्हणतात आम्ही काम करण्यासाठी सत्तेत जात आहोत. सत्तेसाठी लाचारी स्वीकारणे योग्य नाही, अशी ठाम भूमिका त्यांनी यावेळी मांडली. तसेच कोणत्या विचारामागे राहून आपण काम करतोय हे पाहणे गरजेचे आहे. राजकारणात विचार आणि आचार फार महत्वाचे असतात. शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्या मागे लोक मोठया ताकदीने उभे आहे. शरद पवार, उद्धव ठाकरे आणि राहुल गांधीच ही परिस्थिती बदलू शकतात यावर लोकांचा ठाम विश्वास आहे, असेही ते म्हणाले. आज टिव्हीद्वारे जाहिराती प्रसारित केले जात आहे. सर्वत्र सत्ताधारीच दिसतील अशी व्यवस्था केली जात आहे. जाहिरातींवर एवढ्या मोठ्या प्रमाणात खर्च केला जात असेल तर विचार करा यांची मिळकत किती असेल ? या सरकारने इलेक्टोरल बाँड्स नावाची व्यवस्था मध्यंतरी सुरू केली. विविध संस्थांच्या माध्यमातून यांनी पैसे घेतले त्याची माहिती गुप्त ठेवण्यात आली. लोक कोर्टात गेल्यावर सुप्रीम कोर्टाने सांगितले की सर्व व्यवहार जाहीर करा. हे जाहीर झाल्यावर कळले की निम्म्याहून अधिक पैसे हे भाजपला मिळाले आहे. ज्यांनी पैसे दिले त्यांच्यावर ईडी, आयटी या संस्थांद्वारे कारवाई सुरू होती. पैसे दिले तेव्हा सुटका झाली. हा उघड उघड भ्रष्टाचार आहे. भ्रष्टाचार कसा करावा याची नवी व्यवस्था निर्माण करण्याचा प्रकार मागच्या पाच वर्षांत झाला. एकीकडे 'न खाऊंगा न खाने दुंगा' म्हणायचे आणि दुसरीकडे 'जो भी है वो मैंही खाऊंगा' असे केले जात आहे, असा टोलाही त्यांनी लगावला.

### लोकांनी नीलेश लंके यांच्या बाजूनेच मतांचा पाऊस पाडावा


अहमदनगर जिल्हा हा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा जिल्हा आहे . त्यांना दुर्दैवाने फार तरुण वयात आपल्या पतीला गमवावे लागले पण त्यांनी न डगमगता राज्य सांभाळले . आपल्या राज्याचे रक्षण त्यांनी केले . हा आपला इतिहास आहे . नीलेश लंके या विचारांचे पाईक आहेत . दिल्लीच्या तख्तासमोर झुकायचे नाही हा शरद पवार, उद्धव ठाकरे यांचा बाणा आहे, असेही ते म्हणाले . आमच्यातले काही सरदार तिकडे गेले आहेत, पण दिल्ली दरबारी त्यांना काही मान नाही . दिल्ली त्यांना बाहेर तत्काळात ठेवते . काल आमचे साताऱ्याचे छत्रपती चार दिवस दिल्लीत होते, पण त्यांना भेटीसाठी वेळ दिला गेला नाही . अरे दिल्ली दरबारात दुसऱ्या रांगेत उभे केले म्हणून शिवराय बादशाहाचा भरलेला दरबार सोडून निघून आले . शिवराय आणि शंभूराजांनी आपल्याला स्वाभिमानाचे बाळकडू पाजले . हा स्वाभिमान आपण सर्वांनी जपला पाहिजे, असे सांगत असतानाच नीलेश लंके या लढाईच्या रिंगणात आहेत . दुसऱ्या बाजूने सर्व गोष्टींचा पाऊस पाडला जाईल पण लोकांनी लंके यांच्या बाजूनेच मतांचा पाऊस पाडावा, असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले .

# फडणवीस, सातपुतेंविरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार

## गुन्हा नोंद करून गृहमंत्री पदावरून हकालपट्टी करा : अतुल लोंढे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू असताना भाजपा नेते, राज्याचे उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पदाचा गैरवापर करून आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन केले आहे. त्यामुळे त्यांच्यावर गुन्हा नोंद करून त्यांची गृहमंत्री पदावरून तात्काळ हकालपट्टी करावी, अशी मागणी प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहून केली आहे.



MAHARASHTRA PRADESH CONGRESS COMMITTEE

Date : 1st April, 2024

To,
The Chief Electoral Officer,
State of Maharashtra.

Subject: Complaint Regarding Violation of Model Code of Conduct by Deputy Chief Minister Devendra Fadnavis and BJP Candidate Ram Satpute During 2024 Lok Sabha Election.

Respected sir,

I am writing to bring to your attention a grave violation of the model code of conduct by the Bharatiya Janata Party (BJP) and its leaders, particularly Deputy Chief Minister Mr. Devendra Fadnavis and BJP candidate from Solapur (42) Parliamentary Constituency Mr. Ram Satpute, during the ongoing Lok Sabha election in India Maharashtra.

It has come to my notice, through video evidence, that Mr. Ram Satpute called upon Deputy Chief Minister Mr. Devendra Fadnavis for assistance in withdrawing 353 IPC cases. Shockingly, Mr. Fadnavis agreed to facilitate this withdrawal, indicating a clear misuse of power and position. Such actions blatantly violate the codes of conduct set forth for elections, as they attempt to influence voters through unfair means.

Furthermore, Mr. Fadnavis, acting in his capacity as the Deputy Chief Minister and Home Minister during the enforcement of the model code of conduct, thus attempting to sway voters with misleading information. It is imperative to note that the withdrawal of cases must adhere to due process, as mandated by a ruling of the Honorable Supreme Court, and any attempt to bypass this process amounts to contempt of court.

राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला पाठवलेल्या तक्रारीत काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे म्हणतात की, लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी आयोजित एका बैठकीत सोलापूर लोकसभा मतदारसंघाचे भारतीय जनता पक्षाचे उमेदवार राम सातपुते यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फोन करुन एका समाजाच्या काही व्यक्तींवर कोविड काळात दाखल केलेले गुन्हे मागे घेण्याची मागणी केली व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही ते गुन्हे मागे घेऊ, चिंता करण्याचे काही कारण नाही असे त्या बैठकीत उपस्थितांना आश्वासित केले. निवडणुकीच्या काळात अशा पद्धीतने प्रलोभन देणे, आश्वासन देणे हा आचारसंहितेचा भंग आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार राज्य सरकारच्या समितीने शिफारस केल्याशिवाय हे गुन्हे मागणे घेता येत नाहीत. तरीही मतदारांना प्रलोभन देण्यासाठी देवेंद्र फडणवीसांनी आश्वासन देऊन मतदारांची दिशाभूल केलेली आहे.

आतापर्यंत या समाजातील व्यक्तींवरील गुन्हे का मागे घेतले नाहीत? आता निवडणुकीच्या दरम्यान या गुन्ह्यांची आठवण कशी झाली? फडणवीस गुन्हे मागे घेण्याचे आश्वासन देण्यासाठी निवडणुकीची वाट पहात होते का? असे प्रश्न उपस्थित करत गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पदाचा गैरवापर केल्याचे स्पष्ट दिसत आहे, फडणवीस यांना गृहमंत्री पदावरून तात्काळ दूर करावे तसेच सोलापूरचे भाजप उमेदवार राम सातपुते यांची उमेदवारी रद्द करा, अशी तक्रार काँग्रेस पक्षाने निवडणूक आयोगाकडे केली आहे, असे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे म्हणाले.




# रिसोड तालुक्यातील मजुरांची रोजगारासाठी भटकंती सुरू


## मोठ्या उद्योगांची वानवा, शेतीलाही सिंचनासाठी पाण्याची उपेक्षाच

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** तालुक्यातील रोजगाराचा प्रश्न हा कायमच मजुरांच्या चटणी-भाकरीची परवड करनारा ठरत आलेला आहे. शासनाने माहात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत येथिल रोजगाराचा प्रश्न सोडविण्याला जरी हातभार लावला तरी येथिल ठेकेदारी, कमीशन पध्दतीने मनरेगाचा रोजगार हा खऱ्या मजुरांसाठी मृगजळी ठरल्याचे स्पष्ट झाल्याने ऐन मार्च महिन्या मध्ये मजुरांना रोजगारासाठी स्थलांतर करावे लागत असून अनेक वाडी-वस्त्या ओसाड पडत आसल्याचे विदारक चित्र दिसुन येत आहे. रिसोड तालुक्यातील सुमारे शंभर गावे असून या मध्ये तीन ओसाड गावांचा समावेश येतो. बहुतांश गावातील मुख्यव्यवसाय म्हणुन शेतीकडे पाहिल्या जाते. त्यामुळे शेतीला मजुरांची नितांत गरज भासते. परंतु अनेकदा मजुराला मजुरीचा योग्य मोबदला स्थानिक ठिकाणी मिळत नसल्याने मजुर रोजंदारी न करण्यावर सुध्दा ब्रेक लावतात. येथिल शेती व्यवसायाला यांत्रीक पध्दतीची जोड लाभली आसली तरी बहुतांश शेती कामांसाठी मजुरांचीच आवश्यकता भासते. परंतु मजुरीचे दर माणुस पाहुण कमी जास्त होत आसल्याने अनेकदा मजुरांचा सुध्दा हिरमोड होत आसल्याचे बोलल्या जाते आहे. त्यातच रिसोड तालुक्यातील बोटावर मोजण्या इतके गावे सोडली तर जवळपास बऱ्याच गावांमधे मुबलक सिंचनासाठी पाणी उपलब्ध नसल्याने जिरायती शेतीत गणल्या जाते. तालुक्यातील शेतकरी सोयाबीन तूर या पिकाची लागवड करतात हे पीक साधारणतः डिसेंबर जानेवारी मधे काढणी होतात. त्यानंतर शेतीमधे फारसे काम नसल्याने बारमाही काम मजुरांना मिळत नाही, त्यातच तालुक्यात कोणतेच मोठे कंपनी ऊद्योगधंदे नसल्या कारणामुळे तालुक्यातील मजुरांना रोजगारासाठी स्थलांतर करावे लागत आहे. रिसोड तालुक्यातील आजही अनेक गावाची नववर्षाची सुरूवात ही तीव्रपाणी टंचाईने होते. तर अनेक गावामध्ये वापराचे पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. परंतु पिण्याच्या पाण्यासाठी शिवार फेरी मारावी लागत आसल्याचे विदारक चित्र दिसुन येते. अनेक गावातील पाणी योजनेचे पाणी पिण्या योग्यच नाही. त्यामुळे गढुळ पाण्यामुळे अनेक आजारांना आमंत्रण मिळत आहे. तालुक्यातील सुमारे 31 गावांतील पाणी टंचाईवर मात करण्यासाठी विहीरी अधिग्रहण करण्याचे प्रस्ताव बऱ्याच गावातील अद्यापही मंजूर झाले नसल्याचे बोलल्या जात आहे. त्यामुळे येणाऱ्या पाणी टंचाईचा सामना कसा करावा हे येणारा काळच ठरवेल.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

नाथषष्ठीच्या निमित्ताने नाथांच्या चरित्राचा अभ्यास सुरु केला आणि नाथांच्या चरित्राने मला झपाटून टाकले. यापूर्वीही नाथांचे चरित्र ऐकले, वाचले होते. पण या लेखाच्या निमित्ताने पुन्हा अभ्यासण्यास सुरुवात केली. आणि मग नाथांची थोरवी लक्षात आली. मनाला प्रश्न पडला की नाथांना नेमके काय म्हणावे ? संत, समाजसुधारक, तत्वज्ञानी, शांतीमूर्ती, दयेचा सागर, आदर्श शिष्य, आदर्श गृहस्थाश्रमी, आदर्श पिता,आदर्श पती की महान लेखक, कवी ? या सगळ्या गोष्टींचा मूर्तिमंत समुच्चय म्हणजे संत एकनाथ. नाथांचे गुरु जनार्दनस्वामी. परमार्थातील अत्यंत अधिकारी व्यक्ती. त्यांचा मार्गदर्शनाखाली नाथांचे विविध ग्रंथांचे अध्ययन पूर्ण झाले. त्यांनीच नाथांना श्री दत्तात्रयाचे दर्शन घडवले आणि नंतर नाथांना सर्वसामान्य जनांना समजेल अशा भाषेत चतुःश्लोकी भागवतावर टीका लिहिण्याची आज्ञा केली. आणि गुरुआज्ञेने त्यांनी ती अत्यंत रसाळ भाषेत लिहिली. पुढे गुरूंच्या आज्ञेनुसार तीर्थयात्रा पूर्ण करून त्यांनी गृहस्थाश्रमाचा स्वीकार केला. ते पैठणला स्थायिक झाले. त्यांच्या पत्नीचे नाव गिरिजाबाई. त्या अत्यंत पतिव्रता आणि समंजस होत्या आणि आपल्या पतीच्या कार्यात त्यांनी पतीला पूर्ण साथ दिली. म्हणून नाथांच्या चरित्रात गिरीजाबाईंचे स्थानही तेवढेच महत्वाचे आहे. नाथांना एकूण तीन अपत्ये झाली. गोदा व गंगा या दोन मुली आणि हरिपंडीत हा मुलगा. नाथांजवळ श्रीमंत-गरीब, उच्च-नीच असा कोणताही भेदभाव नव्हता. सर्वांशी ते समत्वभावाने वागत. त्यांचा मुलगा हरिपंडीत याला मात्र नाथांचे हे वागणे पसंत नव्हते. पण पुढे मात्र त्याचे मतपरिवर्तन झाले व तो ही नाथांचा शिष्य बनला. नाथांचे घर म्हणजे बहुजनांचे एक चालते-बोलते विद्यापीठच बनले होते.त्यांचे संपूर्ण जीवन म्हणजे चालता-बोलता नीतिपाठ होता. पावित्र्य, शुचिता, दया, क्षमा, शांती,भूतदया इ. दैवी गुणांचा मूर्तिमंत आदर्श म्हणजे त्यांचे जीवन. ते जसे बोलले तसेच जगले. ' बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले' ही उक्ती त्यांचाकडे पाहून सार्थ ठरते. खऱ्या अर्थाने ते अनाथांचे, दीन दुबळ्यांचे नाथ होते. लोकांची सेवा, भगवद्भजन, नामस्मरण, कीर्तन, प्रवचन यात त्यांचा वेळ व्यतीत होई. नाथांचे सगळ्यात महत्वाचे कार्य म्हणजे आज जी ज्ञानेश्वरी आपण वाचतो किंवा अभ्यासतो ती ज्ञानेश्वरी शुद्ध स्वरुपात आणण्याचे काम त्यांनी केले. ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी लिहिल्यानंतर काळाच्या ओघात तिच्या प्रतींमध्ये अशुधता आली होती. या ज्ञानेश्वरीच्या उपलब्ध असलेल्या प्रतींचे शुद्धीकरण एकनाथांनी केले.






## आनंदी पहाट

## सुप्तावस्थेत असणारे अंतर्मन अधिक महत्वाचे

आधुनिक केसरी

सर्वप्रथम बाह्यमन त्याचा विचार करायला लागतं आणि त्याच वेळी आपल्या सुप्त अंतर्मनावर प्रत्येक विषय प्रतिबिंबित होत राहतो. मग क्रिया आणि प्रतिक्रियांचा खेळ सुरु होतो. अंतर्मनावर प्रतिबिंबित झालेले प्रत्येक विचार आपल्या वर्तन आणि व्यवहारांमध्ये परिवर्तन करत राहतात. प्रत्येकाची आनंदाची व्याख्या जशी निराळी असते, तशीच अनुभूती देखील वेगवेगळी असते. खरं तर आपापल्या अनुभूती आणि प्रचीतीनुसार आपली आनंदाची व्याख्या तयार होत असते. आनंद आपल्या अंतरंगात निर्माण होत असतो. आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहारावर तो निर्माण कसा, किती आणि कधी होतो ? ते अवलंबून असतं. आपल्यासाठी आपलं सुप्तावस्थेत असणारं अंतर्मन अधिक महत्वाचं असतं. आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहारांचा थेट परिणाम आपल्या अंतर्मनावर होत असतो. विचार, वर्तन आणि व्यवहार सकारात्मक पातळीवर अंतर्मनावर कोरले गेले तर यशप्राप्ती सहज साध्य आणि शक्य होत असते. याउलट नकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहार या सर्वांमुळे अंतर्मनाला दुःख आणि अपयश आपल्या वाट्याला येतं. प्रत्येक विषयाकडे आपण कसं पाहतो त्यानुषंगाने आपलं वैचारिक मंथन सुरु होत असतं. अनेकदा आपल्या अंतर्मनातील विचारांमध्ये आपण गुरफटले जात असतो, अगदी न कळत होत असतं तसं. दिवसभरांत एकूण सत्तर हजार विचार आपल्या अंतर्मनांत निर्माण होत असल्याचं विज्ञानाच्या प्रयोगांतून स्पष्ट झालं आहे. त्या विचारांना विशिष्ट दिशा, गती अथवा विषय असतीलच असं नाही. दिवसभरात आपल्या मनांत आलेले सर्वच विचार, तसं बघितलं तर, आपल्या लक्षात देखील राहतातच असं नाही. असं म्हंटलं जातं कि आपल्या प्रत्येकाची दोन मनं कार्यरत असतात. एक अंतर्मन कि जे सुप्त स्वरुपात कार्यरत असतं आणि दुसरं बाह्यमन, ज्याचं कार्य जाणीवपूर्वक सुरु असतं.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी


## मिळेल आनंद | विवेकाचे ||

गुणावगुणांची | करावी पारख ||
वेचावे निवडक | विचारांती ||१||
नको कधीकाळी | वासनेचा गंध ||
सात्विकांचा छंद | मज लागो ||२||
पाप-पुण्य भेद | जाणावा सकळ ||
ध्यानी कर्मफळ | ठेव मना ||३||
भाव समर्पित | जपावा अंतरी ||
ज्ञानचि उदरी | यावे जन्मा ||४||
संतसज्जनांचे | झाडावे अंगण ||
मिळेल आंदन | विवेकाचे ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## हितगुज



पुष्प ३०वे



**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**

## विद्यारूपा सरस्वती

देवी सरस्वती ची प्रार्थना ज्या मंत्राने केली जाते, तो मंत्र आहे - "ऐं अंबितमें नदीतमे देवितमे सरस्वती। अप्रशस्ता इव स्मसि प्रशस्ति मम्ब न स्कृधि॥" सखोल अर्थाच्या या साध्या दोन ओळी! विस्तृत निळ्या जलाचे वस्त्र धारण केलेल्या सरस्वती नदीचा खोल, शांत, अथांग प्रवाह पाहून वैदिक काळातल्या तपस्वीच्या मुखातून उत्स्फूर्तपणे प्रकट झालेले मंत्रात्मक शब्द देवी सरस्वतीची प्रार्थना बनले आहेत. या प्राचीन मंत्राचा आशय या प्रकारे आहे - हे माते! आम्ही संकुचित बुद्धीचे, भावनेचे आहोत, अंतःकरणाने दीन-दुबळे, हीन आहोत. तरी तुझ्या कृपेने ते विशाल, असीम बनव, प्रशस्त करणे म्हणजे विस्तृत, विशाल बनवणे होय. महाभारतात यक्षाने युधिष्ठिराला प्रश्न केला होता कि - पुरुषाचा विस्तार केवढा आहे? या प्रश्नाच्या उत्तरात युधिष्ठिराने सांगितले - "पुण्यकर्माचे शब्द आकाशभेदी असतात. ते जेथवर आकाशाचे भेदन करतात तेथवर पुरुषाचा विस्तार असतो." उत्तर अतिशय मार्मिक व चिंतनगर्भी आहे. पुण्यकर्म अस्तित्त्वाच्या काळमर्यादेला ओलांडून युगानुयुगे व्यक्तिला कीर्तिमान करीत रहाते. ही चिरंतन सुकीर्तिमानता म्हणजे मनुष्यत्त्वाचा विस्तार अर्थात् माणूसपणाची प्रशस्तता आहे. जे प्रशस्त असते तेच सुंदर असते. या पृथ्वीवर सर्वांचे, चराचराचे समभावनेने पालन-पोषण करणाऱ्या , शेते पिकवणाऱ्या , त्यातून वेगवेगळे स्वाद, माधुर्य देणाऱ्या नद्या, धरती, प्रशस्ततेची मूर्त रूपे आहेत. भौतिक जगणे त्यांच्या माध्यमातून समृद्ध होते. आंतरिक प्रशस्ततेची मूर्त रूपे आहेत. भौतिक जगणे त्यांच्या माध्यमातून समृद्ध होते. आंतरिक प्रशस्तता ज्ञानाच्या अथांग व जनोपयोगी प्रवाहाने प्राप्त होते. ही ब्राह्मी, श्री विद्यारूपा सरस्वती व नदीरूपा सरस्वती दोन्ही पूज्यनीय, वंदनीय आहेत. म्हणूनच सरस्वती ही परममाता आहे. सरस्वती जलरूपा व वाक्रूपा आहे. 'वाक्' शब्दाचा अर्थही व्यापक आहे. प्रत्येक चेतन कंठातले स्वर, सरस्वतीच्या वीणेचे स्वर आहेत.


**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

थूल सूक्ष्म कारण बना, मह कारण से एह ।
केवल हँस स्वरुप है, यह षट जानो देह
।।१७।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल अष्टम अध्याय) ०२/०८/१७

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
स्थूल, सूक्ष्म, कारण, महाकारण, कैवल्य आणि हंस असे सहा देह असतात.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.




स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

## देह हा परमार्थाचे साधन समजावा

आधुनिक केसरी

संतांचे काम तुम्हाला देहबुद्धीपासून सोडविणे हे आहे; तुम्हाला मुलगा देणे, तुमचे दुखणे बरे करणे. म्हणजे विषय देणे, हे नव्हे. जो जो परमार्थाला लागावे तो तो देहबुद्धी तिथून ओढण्याचा जास्त जास्त प्रयत्न करते. विद्येची बुद्धी ही देहबुद्धीला धरून आहे; ती मारून आपण शुद्ध केली पाहिजे. याकरिता भगवंताच्या स्मरणासारखा दुसरा उपाय नाही. कुत्रा हा आपल्याला रात्रीच्या पहाऱ्यासाठी उपयोगी पडतो. पण तो कितीही चांगला आणि उपयोगी असला, तरी आपण त्याला पानात जेवायला घेऊन बसत नाही. त्याप्रमाणे देहाचेही आहे. आतल्या खोबऱ्याच्या रक्षणाकरिता ज्याप्रमाणे करवंटी, त्याप्रमाणे देहाला परमार्थाकरिता साधन मानावे. पण मनुष्य ' हा देहच मी आहे ', असे मानून व्यवहार करतो. वास्तविक, आपण देहापासून निराळे आहोत असे पदोपदी दाखवीत असतो; माझा हात, माझा पाय, माझा डोळा, माझे मन फार काय, माझा जीव असेही म्हणतो; पण वागतो मात्र ' मी तोच आहे ' असे समजून.



देहाशी संबंध जास्त येईल असेच आपण भगवंताजवळ मागतो; असे न करावे. आपल्या देहावरचे प्रेम कमी होण्यासाठी, दुसऱ्यावर प्रेम करायला लागावे. प्रेम बसायला आपल्याला आपल्यासारखाच देहधारी लागतो. कुत्रे रडत असले तरी आपल्याला नाही वाईट वाटत; पण एखादे लहान मूल रडत असले तर वाईट वाटते. देवावर प्रेम करायला, देवाला आपल्यासारखाच देहधारी कल्पावा लागतो. म्हणून, आपले देहावरचे प्रेम कमी व्हायला, देहबुद्धी कमी व्हायला, सगुणमूर्तीचे, सद्गुरूचे ध्यान करावे लागते. ते जसजसे दृढ होत जाईल, तसतसे आपण स्वतःला विसरून जातो; आणि आपण देहाच्या पलीकडे गेलो, म्हणजे सद्गुरूचे खरे स्वरूप हे देहातीत आहे असे प्रत्ययाला येते. देहबुद्धी नष्ट होईल तसतशी सद्गुरूची खरी ओळख होईल. ज्याने देहाभिमान नष्ट केला त्याचा मोठा ज्ञानीसुद्धा हेवा करतो. ' मी देह ' म्हणावे, यापलीकडे दुसरे अज्ञान कोणतेही नाही. मी भगवंताचा असून देहाचा म्हणणे यासारखे दुसरे खोटे नाही. प्रपंचात संकटे येतात, तरी पण तो सोडावासा वाटत नाही; याहून भगवंताची माया ती कोणती ? अतिसहवासामुळे देहाचे ममत्व सुटत नाही. परमात्म्याचा सहवास, उदाहरणार्थ, देवाला जाण्याचा वा जप करण्याचा नेम केला, म्हणजे देहाचे ममत्व थोडे थोडे कमी होते. देहाच्या सहवासाने आपण देहाचे होतो, नामाच्या सहवासाने आपण परमात्म्याचे होऊ. **१३७. भगवंताच्या स्मरणामध्ये देहबुद्धीचे मरण आहे.**

## मायाब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आपण सगळी मर्त्य माणसं आहोत. मित्रांनो मानव जन्म एकदाच मिळतो तेव्हा तेव्हा संतांनी घालून दिलेल्या आदर्श जीवन पध्दतीने जगून म्हणजेच कोणत्याही प्रकारचा "अतिलोभ"न धरता जीवन जगावे व शेवटी मोक्षास पात्र व्हावे हाच तर संतांचा विचार आपण अंगात रूजवला पाहिजे व मोक्षास पात्र झाले पाहिजे. सज्जन वाचक मंडळी 'साधक' हा फक्त तीन अक्षरी शब्द आहे. पण आपल्या समर्थांनी किती वेगवेगळ्या पैलुंने त्याला आपल्या समोर मांडले आहे. एक समर्थाचे विचार व दुसरे म्हणजे भारतीय लोकांना तत्वज्ञानाचे बाळकडू समर्थ खूप विचारांती आपल्याला सांगतात.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, २ एप्रिल २०२४
adhunikkesari.com



# प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या कार्य अहवालाचे प्रकाशन

## मुंडेंचे कार्य चौफेर : मान्यवरांकडून कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी पंचवीस हजारा पेक्षा अधिक पत्रकार सदस्य असलेल्या संघटनेला विविध उपक्रम राबवून सामाजिक चेहरा दिला. प्रश्न मांडून ते सोडवण्यासाठी उपाय सुचवले त्यामुळे त्यांचे संघटना व सामाजिक कार्य चौफेर असल्याने त्यांचे नेतृत्व सर्वमान्य झाले आहे अशा शब्दांत मान्यवरांनी कौतुक केले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पुणे येथील राज्यस्तरीय अधिवेशनत पत्रकार बाबा देशमाने यांनी संपादित केलेल्या प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या कार्य अहवाल पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. जेष्ठ पत्रकार डॉ. उदय निरगुडकर, पत्रकार निरंजन टकले, लेखक अरविंद जगताप,महेश म्हात्रे, मंदार फणसे, आशिष जाधव आमदार उमा खापरे, उपस्थितीत होत.

**25 हजारांहून अधिक सदस्य :** प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे म्हणाले, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्यभरात पंचवीस हजाराहून अधिक पत्रकार सदस्य आहेत . प्रत्येक सदस्याला अडचणीच्या काळात मदत व्हावी यासाठी संघटना सक्रिय असते . पत्रकारांच्या विविध प्रश्नासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ कायम आक्रमक भूमिका घेऊन काम करतो त्यामुळे राज्यात सर्वाधिक सदस्य संख्या असलेल्या राज्य पत्रकार संघ झाला आहे . प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी व्यक्त केले .

तर संघटनेचे प्रदेश सरचिटणीस विश्वास आरोटे, उपाध्यक्ष नितीन शिंदे, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष पराग कुंकुलोळ आदी पदाधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांचे सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील कार्य चौफेर असून ते दूरदृष्टी असलेले पत्रकारांचे नेते आहेत, अशा शब्दांत उपस्थित मान्यवर संपादक, पत्रकारांनी आपले मत मांडले. संपादक बाबा देशमाने यांनी मुंडेंचा सामाजिक पत्रकारितेतील प्रवास नेमकेपणाने पुस्तकाच्या माध्यमातून मांडला आहे. सामान्य कुटुंबातून आलेल्या वसंत मुंडे यांच्या कार्यक्षमता आणि चौफदृष्टी या पुस्तिकेतून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. या पुस्तिकेचे राज्यभरातील मान्यवर संपादक आणि पत्रकारांनी कौतुक केले आहे.

# भारतरत्नचे राजकारण दुर्दैवी; काँग्रेसचा केविलवाणा प्रयत्न

## भाजपा प्रवक्ते राम कुलकर्णी यांची सडकून टीका

आधुनिक केसरी न्यूज



**अंबाजोगाई :** देशाच्या राजकारणात काम करताना काँग्रेस पक्षाने नेहमीच संकुचित आणि अविचारी बुद्धीनं कारभार केला आहे. त्या पक्षाच्या अंगी मनाचा मोठेपणा कधीच नाही आणि नव्हता. अविवेकी असल्यानेच भारतरत्न पुरस्कारांच्या कार्यक्रमाचे देखील काँग्रेस राजकारण करू पहातात हे दुर्दैवी आहे. काँग्रेसचा हा केविलवाणा प्रयत्न असल्याची खरमरीत टीका भाजपा प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी केली.

जेष्ठ नेते लालकृष्ण आडवाणींना भारतरत्न सन्मान महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू देताना क्षणभर व्यासपीठावर उपस्थित होत्या. त्यात महिला विरोधी मानसिकता असण्याचा प्रश्नच उठत नाही. तुमच्या काळात पुरस्कार देताना तत्कालीन महामहीम राष्ट्रपती हे उभा रहायचे. या शब्दांत भाजपा राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी काँग्रेसवर जोरदार हल्ला चढविला. आमच्या प्रतिनिधीशी बोलताना त्यांनी म्हटले आहे की, देशाच्या महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या शुभ हस्ते काल भाजपाचे जेष्ठ नेते लालकृष्ण आडवाणी यांना भारतरत्न पुरस्कार देण्यात आला. यावेळी वृद्धापकाळाने आडवाणी त्यांच्या निवासस्थानी खुर्चीवर बसलेले शेजारी पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी दिसतात. त्या दरम्यान सन्मान चिन्ह प्रोटोकॉल प्रमाणे महामहिम राष्ट्रपती यांनी उभा राहुन आडवाणीजींच्या हातात दिलं. त्यानंतर काही क्षणात त्या स्थानापन्न ही झाल्या. मात्र या देखण्या सोहळ्याचं कौतुक करण्यापेक्षा नेहमीच्या सवयीप्रमाणे अविवेकी काँग्रेस पक्षाने राष्ट्रपतीजी उभा असताना एक फोटो काढत ट्विट केलं आणि भाजपची मानसिकता महिलांच्या विरोधी कशी असल्याचा सवाल उपस्थित केला ? वास्तविक पहाता चांगलं कुणाचं देखवत नसेल तर किमान नावं ठेवणे नको, ही खऱ्या अर्थाने भारतीय राजकारणाची संस्कृती आहे. पण, ज्या काँग्रेसने नेहमीच द्वेषाचं, सुडभाव वाढविण्याचं काम केलं त्यांची अजुनही दृष्टी आंधळीच असल्याचं प्रवक्ते कुलकर्णी यांनी म्हटलं. संकुचित विचारानं देश चालवला म्हणुनच खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य मिळून देखील या देशाला अमृतकाल येण्यासाठी पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांच्या नेतृत्वाच्या उदयाची वाट पहावी लागली. वास्तविक पहाता भाजपानं एका आदिवासी, तेही सामान्य कुटुंबातील महिलेला राष्ट्रपती पदाच्या सर्वोच्च पदावर बसवलं हेच खऱ्या अर्थाने काँग्रेसची पोटदुखी असल्याचे कुलकर्णी यांनी पुढे बोलताना म्हटले. खरे तर काँग्रेसनं प्रस्थापितांना नेहमीच साथ दिली. परिवारवाद हा त्यांच्या विचाराचा बाणा असुन भाजपाच्या राजकारणाची मुळ धारणा सामान्य माणुस आहे. त्यांना राष्ट्रपती पदावर बसवणं म्हणजे एका आदिवासी समाजाला देशाच्या राजकिय प्रवाहात, विकासाच्या मुख्य प्रवाहात प्रतिष्ठा मिळवुन देण्यासारखे होय. ज्यांनी सामान्य लोकांच्यासाठी पन्नास वर्षांत काही केलं नाही त्या काँग्रेसला अशा प्रकारचे आक्षेप घेण्याचा मुळीच नैतिक अधिकार नाही. महिलांच्या नावाने उदो - उदो करणाऱ्या काँग्रेसवाल्यांनी महिला आरक्षणाचे घोंगडे इतक्या वर्षी भिजत का ठेवलं ? असा सवाल ही कुलकर्णी यांनी केला. हे मात्र नक्कीच आहे की, पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांच्या नेतृत्वाखाली होवू घातलेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपा 400 पार होणार आणि पुन्हा तिसऱ्यांदा पंतप्रधान पदावर नरेंद्रभाई मोदी विराजमान होणार हे त्रिवार सत्य असल्याने काँग्रेसवाल्यांची मानसिकता बिथरणे हे साहजिकच म्हणावे. परिणामी अशा प्रकारचे कुविचार त्यांच्या डोक्यातुन पुढे येतात आणि भारतरत्न सारख्या पुरस्कारावर ही ते राजकारण करतात. मात्र सामान्य जनतेला त्यांची निती पटत नसल्यानेच हा पक्ष रसातळाला जात असल्याचे भाजपा प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

# आचारसंहिता भंगप्रकरणी पहिला गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू होताच निवडणूक आयोगासह जिल्हा प्रशासन,तालुका प्रशासन तसेच गाव पातळीवर ग्रामपंचायत प्रशासन कामाला लागले आणि आचारसंहितेचा भंग होऊ नये यासाठी विविध उपाययोजना करण्याचे नियोजन केरण्यात येत आहे. शहर व गावातील रस्त्यावरील राजकीय पक्षांचे होर्डिंग्ज, बॅनर, उद्घाटन फलके, सार्वजनिक ठिकाणी लावण्यात आलेले झेंडे काढून जमा करण्यात आले. मात्र असे असतानाही उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक निवडणूक अधिकारी वैशाली देवकर ह्या रिसोड तालुक्यातील गावांना भेटी देऊन निवडणूक केंद्रांची पाहणी दरम्यान दिनाक 30 मार्च रोजी रिसोड तालुक्यातील लोणी बू गावामधे गेल्या असता त्यांना रस्त्याने सार्वजनिक ठिकाणी भगवे झेंडे असल्याचे निदर्शनास आल्याने आदर्श आचार संहिता भंग झाल्याची घटना उघडकीस आली. यावर सहायक निवडणूक अधिकारी वैशाली देवकर यांनी तात्काळ ग्राम पंचायत सचिव यांना सदर प्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. त्यानुसार काही अज्ञात व्यक्तीने शासकीय विद्युत खांबावर भगवे रंगाचे झेंडे लावून आचारसंहिता भंग केल्याप्रकरणी लोणी बू ग्रामपंचायत ग्रामसेविका रजनी डोंगरदिवे यांनी रिसोड पोलिसात फिर्याद दिली असून अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, आचारसंहिता लागू झाल्यानंतर गावातील सर्व होर्डिंग, बॅनर, झेंडे काढून टाकण्यात आल्याचे ग्रामसेवक रजनी डोंगरदिवे यांनी पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. मात्र 30 मार्च रोजी रात्री काही अज्ञात व्यक्तीने गावातील विद्युत खांबावर भगवे झेंडे लावून आचारसंहितेचा भंग केल्याने पोलिसांनी अज्ञात आरोपी विरोधात कलम 188 अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

# माजी नगरसेवक पप्पू देशमुख यांचे जिल्हाधिकाऱ्यांना आव्हान

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** आदर्श आचारसंहिता भंग केल्याच्या प्रकरणात मनपा आयुक्त विपिन पालीवाल यांचा बचाव करणारी प्रतिक्रिया जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी एका वाहिनीला दिली. आयुक्त पालीवाल यांनी आदर्श आचार संहिता लागू होण्याच्या पूर्वी प्रसिद्धीस पाठवलेली 24 कोटी रुपयांची ई-निविदा दोन दिवसांच्या सलग सुट्ट्यांमुळे शासनाच्या वेबसाईटवर उशिरा प्रकाशित झाली. यापुढे असे होणार नाही याची दक्षता घेण्याची समज आयुक्त पालीवाल यांना दिली असुन सदर प्रकरण आता बंद केल्याची प्रतिक्रिया जिल्हाधिकाऱ्यांनी एका वाहिनीला दिली.

यावर आता जनविकास सेनेचे संस्थापक अध्यक्ष मनपाचे माजी नगरसेवक पप्पू देशमुख यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. जिल्हाधिकारी विनय गौडा चंद्रपूरचे जिल्हा निवडणूक अधिकारी आहेत. या संवेदनशील पदावर काम करताना जिल्हाधिकाऱ्यांनी दिशाभूल करणारे वक्तव्य करून भ्रष्ट अधिकाऱ्याचा असा बचाव करणे योग्य नाही. तसेच या प्रकरणात आयुक्त पालीवाल यांना कारणे दाखवा नोटीस बजावली असल्यास त्याची प्रत व आयुक्तांकडून मिळालेले लेखी स्पष्टीकरण सार्वजनिक करावे असे खुले आव्हान देशमुख यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले. निवडणूक विभागाने आयुक्तांविरुद्ध कोणतीही रितसर कारवाई केली नाही, एवढेच नव्हे तर या प्रकरणातील मूळ तक्रारच आवक-जावृक विभागातून गहाळ झाली. नियम धाब्यावर बसवून निवडणूक विभागाची संपूर्ण यंत्रणा आयुक्त पालीवाल यांचा बचाव करीत असल्याचा आरोप देशमुख यांनी केला. 16 मार्चला दुपारी 3 वाजता लोकसभा निवडणुकी बाबत पत्रकार परिषद घेणार अशी घोषणा निवडणूक विभागाने एक दिवसापूर्वी केल्याने 16 मार्चला दुपारी 3 वाजेपासून लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होणार अशी पूर्वकल्पना सर्व देशावासियांना 15 मार्चला मिळाली होती. निवडणूक आयोगाने पत्रकार परिषदेच्या तारखेची घोषणा केली त्याच दिवशी 15 मार्च रोजी दुपारी मनपा आयुक्त विपिन पालीवाल यांनी तडकाफडकी 3 वर्तमान पत्रांमध्ये 24 कोटीच्या वादग्रस्त कामाची जाहिरात दिली. ही जाहिरात 16 मार्चला सकाळी प्रकाशित झाली. जाहिरातीमध्ये सदर कामाची ई-निविदा 18 मार्चपासून शासनाच्या वेबसाईटवर प्रकाशित होणार असल्याचा स्पष्ट उल्लेख केला.16 मार्चपासून आचारसंहिता लागू होणार याची पूर्वकल्पना असताना आयुक्त पालीवाल यांनी 18 मार्चपासून ई-निविदा प्रक्रिया सुरू करणे नियमानुसार योग्य आहे का ? हा हेतूपुरस्पर केलेला आचारसंहिता भंग नव्हे का ? याचे उत्तर जिल्हाधिकाऱ्यांनी द्यावे अशी मागणी माजी नगरसेवक पप्पू देशमुख यांनी केली आहे. आमचा आक्षेप हा 16 मार्च रोजी वर्तमानपत्रात प्रकाशित झालेल्या कामाच्या जाहिरातीबाबत नसून आयुक्तांनी 18 मार्चपासून सुरू केलेल्या ई-निविदा प्रक्रिये बाबत आहे. आचारसंहितेचा भंग झाल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी ई-निविदा प्रक्रिया तातडीने रद्द करण्याचे तोंडी निर्देश दिले. मात्र राजकीय दबावाखाली जिल्हाधिकारी मनपा आयुक्तांचा बचाव करीत असल्याचा आरोप देशमुख यांनी केला.

# इम्रान यांना दिलासा

आधुनिक केसरी

तोशखाना प्रकरणामध्ये पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान आणि त्यांच्या पत्नी बुशरा बीबी यांना १४ वर्षांच्या कारावासाची शिक्षा झाली होती. या प्रकरणात आता इम्रान खान आणि त्यांच्या पत्नीला मोठा दिलासा मिळाला आहे. इस्लामाबाद उच्च न्यायालयाने इम्रान खान आणि त्यांच्या पत्नी बुशरा बीबी यांची १४ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा स्थगित केली. पाकिस्तानच्या पंतप्रधानपदावर असताना इम्रान खान यांनी त्यांना मिळालेल्या महागड्या सरकारी भेटवस्तू ठेवल्याचा आरोप त्यांच्यावर होता. पाकिस्तानमध्ये काही दिवसांपूर्वीच सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या. या निवडणुकीच्या काही दिवस आधी म्हणजे ३१ जानेवारीला तोशखाना प्रकरणामध्ये इम्रान खान आणि त्यांच्या पत्नी बुशरा बीबी यांना शिक्षा झाली होती. तसेच इम्रान खान आणि त्यांच्या पत्नीला कोणतेही सार्वजनिक पद स्वीकारण्यास निर्बंध घालण्यात आले होते. याबरोबरच दोघांनाही प्रत्येकी ७८७ पाकिस्तानी दशलक्ष रुपयांचा (जवळपास २३ कोटी) दंड भरण्याचे आदेश देण्यात आला होता. यानंतर या प्रकरणाची सुनावणी इस्लामाबाद उच्च न्यायालयासमोर पार पडली. यावेळी इस्लामाबाद उच्च न्यायालयाने इम्रान खान आणि त्यांच्या पत्नी बुशरा बीबी यांच्या शिक्षेला स्थगिती दिली. तसेच या शिक्षेविरोधातील याचिकेवर ईदच्या सुट्टीनंतर सुनावणी पार पडेल, असे इस्लामाबाद उच्च न्यायालयाने स्पष्ट केले. पाकिस्तानधील एका शासकीय विभागाचे तोशखाना हे नाव आहे. पाकिस्तानमध्ये लोकप्रतिनिधींना मिळणाऱ्या भेटवस्तू या तोशखाना विभागामध्ये जमा कराव्या लागतात. मात्र, इम्रान खान यांनी त्यांना मिळाळेल्या मौल्यवान भेटवस्तू जमा न करता विकल्याचा आरोप त्यांच्यावर होता. तसेच त्यांना मिळालेल्या भेटवस्तूंची माहिती तोशखाना विभागाला दिली नसल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. इम्रान खान २०१८ मध्ये पाकिस्तानच्या पंतप्रधानपदावर होते. यावेळी त्यांना मिळालेल्या मौल्यवान भेट वस्तू तोशखाना विभागात जमा न केल्याप्रकरणी विरोधी पक्षाकडून त्यांच्यावर टीका करण्यात आली होती.

# सुनेत्रा पवार जर आई, मग निवडणूक का लढवते लेक सुप्रियाताई ?

आधुनिक केसरी


राम कुलकर्णी, संपर्क 9422742577

**माझ्यावर यशवंतराव चव्हाणांचे संस्कार असल्याचा दाखला देत बारामती लोकसभा मतदारसंघात भाजपानं आमचं घर फोडलं आणि माझ्या विरोधातच एका महिलेला उभं केलं असा टाहो फोडणाऱ्या खा.सुप्रियाताई सुळे पुढे जावुन म्हणतात की, मोठ्या वहिनी आईसमान असतात, एवढा ह्रदयी भावस्पर्श मनात असेल तर मग सुनेत्रा पवारांच्या विरोधात राजकिय लाभासाठी लेकीचा दावा करणाऱ्या सुप्रियाताई आई विरोधात आपली उमेदवारी माघारी घेत बिनविरोध निवडुन देणार का?असा सवाल आता केवळ बारामती नव्हे तर राज्यातील सामान्य जनता करत आहे.**

राजकारण बोलणं तेवढं सोपं नसतं. जळीस्थळी ज्याची त्याला माहिती असतं. पराभवाची नैराश्यता किंवा लक्षणं दिसु लागल्यानंतर कुठलाही राजकिय नेता कौटुंबिक सहानुभुतीचा फायदा घेणे तेही एक राजकारणातलाच डाव म्हणावा लागतो. राष्ट्रवादी पक्षाचे शक्कलं पडल्यानंतर अजितदादा गट बाहेर पडला. परिणामी मोठे पवार विरूद्ध दादा गट वेगळे दोन पक्ष तयार झाले. तसं पाहता निवडणुक आयोगाने मुळ वैचारिक राष्ट्रवादी पक्ष लोकशाही संविधानाचा आधार घेत अजितदादाच्या गटाला कायद्यान्वये देवु केला. शिल्लक राष्ट्रवादी पक्ष सोबत घेवुन महाविकास आघाडीत नाविलाजाने सहभागी असलेले शरदचंद्र पवारांना आता लोकसभा निवडणुक हीच एक संधी आहे.ज्यामुळे आपलं अस्तित्व दाखवणे आणि आलेले राजकिय अपंगत्व सुधारणे होय. दृष्टीक्षेप संभाव्य लोकसभा निवडणुकीवर टाकला तर महायुतीच्या तुलनेत फार काही मोठ्या साहेबांच्या पदरात पडेल असं जवळपास दिसत नाही. तरी पण सुरू असलेली धडपड किंवा त्यांच्या राजकिय जीवनाचा अभ्यास यावरून कुस्तीच्या आखाड्यावर तग धरून आहेतच. बारामती लेकीला खासदार बनवण्यासाठी मागच्या वेळी देखील मोठ्या साहेबांनी जीवाचा आटापिटा केलेला होताच. खरं तर महादेव जानकरांनीच त्यांना पाणी पाजले होते पण थोडक्यातुन बचावले. यावेळी चित्र एकतर्फी निश्चित नाही. अजितदादांना मानणारा वर्ग मोठा तिथे आहे. त्या मतदारसंघात जावु विरूद्ध नणंद अर्थात सुप्रियाविरूद्धा सुनेत्रा अशी लढत ज्याचं चित्र आता स्पष्ट झालं. राजकिय चुल वेगळी मांडल्यानंतर आपआपला धुर आणि जाळ काढण्यासाठी प्रत्येक जण राजकिय फुंकारी फुकणार तो भाग वेगळा. ज्यात कुणाच्या विजयाच्या ज्वाला बाहेर पडणार तर कुणाचा फुफुटा होणार हेही सत्यच म्हणावे लागेल. एक गोष्ट खरी आहे की राजकिय नाशाचे चित्र जेव्हा डोळ्यासमोर दिसु लागतात तेव्हा प्रत्येकच माणुस कौटुंबिक नात्या गोत्याचा आधार घेतो तसं मोठ्या साहेबांनी अजितदादा भावाला देखील सोबत घेवुन कौटुंबिक बाजुला पाडण्याचं सद्या तरी चित्र करून दाखवलं. सुप्रियाताईंना आपल्या विरोधात सुनेत्रा ताई येणार नाहीत असंच वाटत होतं. त्याचं कारण कदाचित अजितदादा असं करणार नाहीत अखेरच्या क्षणी महादेव जानकर येतील असं वाटत असावं. पण राजकारण त्यालाच म्हणतात की ज्या राजकारणात सत्यापुढे कौटुंबिक नाते गोते कुणाला महत्वाचे वाटत नाहीत. अजितदादा महायुतीत सहभागी झाल्याबरोबर त्यांना उपमुख्यमंत्री पदावर बसवलं. मग महायुतीच्या धर्माने किंवा तत्वाचं राजकारण करणारा लढावु बाणा म्हणुन अजितदादाकडे



पाहिल्या जातं. कुटुंबापेक्षा राजकिय धर्म महत्वाचा हे लक्षात घेवुन आपल्या पत्नीचं नाव महायुतीच्या यादीत येवु घातल्यानंतर तशा प्रकारच्या राजकिय हालचाली एक महिन्यापासुन या मतदारसंघात वेगाने पुढे आल्या.

सुप्रियाताई ज्यांना जमिनीवरचं राजकारण कधीच माहिती नव्हतं. प्रस्थापितांच्या घराण्यातल्या त्या वारसदार ज्यांचा जन्म सोन्याचा चमचा तोंडात घेवुन झालेला होता. सामान्य लोकांच्या प्रश्नांची त्यांना मुळीच जाण नाही. लोकसभा असो किंवा राज्यसभा सर्व कार्यकाळ त्यांनी मुंबई, दिल्ली असाच घालवला. वर्षानुवर्षे त्यांचे मतदारसंघ अजितदादांनी पाहिले. कालपरत्वे घडामोडी घडल्यानंतर सामान्य जनतेच्या मागे मागे त्यांना पळावं लागणं साहजिकच पण राजकिय लाभापोटी सहानुभुतीचं बोलणं किती नाटकी असतं?हे सद्या नाटकं त्या मतदारसंघात सुप्रियाताई सुळेकडुन करणं चालु आहे. त्यांचा आरोप असा आहे की, भाजपानं आमचं घर फोडलं. खरं तर मोठ्या पवार साहेबांच्या नशिबाला आलेलं सद्याचं राजकारण त्यांच्या कर्माची फळंच म्हणावी लागतील. कारण महाराष्ट्राच्या राजकारणात घरं फोडणे, गट फोडणे या सर्व आदर्श गोष्टी शरदचंद्र पवारांनाच चांगल्या जमल्या. पण कधी तरी आयुष्यात कर्माची फळं भोगावी लागतात. परळीच्या शिवारात फोडाफोडीची मजा घेणाऱ्यांना कालांतराने या सर्व गोष्टीला सामोरे जावे लागतं हाच खरा नियतीचा खेळ म्हणावा लागेल. सुनेत्रा पवार अर्थात मोठ्या वहिनी ह्या आईसमान असतात.

आम्ही त्यांना मातृसंस्था मानतो अशा प्रकारचा दावा राजकिय लाभ घेण्यासाठी काल सुप्रियाताई सुळेंनं केला. त्यांना कौटुंबिक आदर्श संस्कृतीची प्रचिती हाच खरा विनोद म्हणावा लागेल. पण सुनेत्रा जर आईसमान असतील तर मग उद्याच्या लोकसभा निवडणुकीत प्रत्यक्ष आई निवडणुक लढवतात तर मग लेक म्हणुन तुम्ही आपल्या आईला बिनविरोध निवडुन देणार का अशा प्रकारचा सवाल आता त्या मतदारसंघातील सामान्य जनता करत असुन लेकीचा धर्म सुप्रियाताईंनी पाळलाच तरच कौटुंबिक नात्यावर बोलण्याचा काही नैतिक अधिकार त्यांना असु शकते या शब्दांत आता काही बोलत्या प्रतिक्रिया त्या मतदारसंघातील सुजाण नागरिक देवु लागले हे मात्र नक्की. वर्तमान कुटुंब व्यवस्थेत आई-वडिलांना मुलगा सांभाळील असं आता चित्र दिसत नाही. 75 टक्के आई-वडिलांची भिस्त लेकीवर आहे. कारण लेक हीच आशावादी आणि मायाळु, दयाळु असते. सुप्रियाताईनं लेकीचं नातं जर सुनेत्रा आई यांच्याशी लावलं तर मग बारामतीच्या कुरूक्षेत्रावर पांडवाच्या भुमिकेत अर्थात सत्यवादी कर्म युगात जाताना लेकीचा आदर्श धर्म पाळावा आणि आई असलेल्या सुनेत्रा ताईच्या विरोधात निवडणुक लढवणार नाही हे जाहिर करून उमेदवारी अर्ज भरूच नये तरच तुमच्या आई अनुष्ठानाचा काही अर्थ आणि आदर्श पुढच्या पिढीला घेता येईल. अन्यथा आईचं नातं तुम्ही केवळ राजकिय लाभासाठी समाजाला सांगितलं यावरून तुम्ही किती नाटकी आणि ढोंगी राजकारण करतात? हा चेहराच पुढे आल्याशिवाय रहाणार नाही असा सवाल आता सामान्य जनतेने केला. कै.यशवंतराव चव्हाणांचं नावं मध्यंतरी पित्याचं कौतुक करताना सुप्रियाताईनं घेतलं नव्हतं पण आता पुन्हा राजकिय मैदानात उतरताना यशवंतराव चव्हाणांचे आम्ही वारसदार असं म्हणत नणदेला लेकीची उपमा देत असाल तर हा खरा आदर्श इतर कुटुंबातील लोक पिढ्यानपिढ्या घेतील. पण त्यासाठी त्याग आणि भाव महत्वाचा हे मात्र नक्की. तुम्ही जर राजकिय फायद्यासाठी नणदेला आईची उपमा देतात तर राजकिय नाटक उघडं पडल्याशिवाय रहाणार नाही. हा सारासार विचार बारामती लोकसभा मतदारसंघातील सामान्य जनता केल्याशिवाय रहाणार नाही. सुनेत्रा पवारांना तुम्ही आता आईची उपमा दिली तर मग त्या आईला निवडुन आणण्यासाठी बारामतीकर निश्चित पुढे आल्याशिवाय रहाणार नाहीत.

# वैचारिक तात्त्विकता धुळीस मिळाल्याने टीका टिप्पणीचा स्तर खालवला

आधुनिक केसरी


गणेश खाडे, संपर्क क्र. 9011634301

**वैचारिक मत भेद असणं स्वाभाविक आहे.मनभेद नसला पाहिजे.शब्द हे रत्न आहेत अलंकार आहेत.तसच ते शस्त्र पण आहेत याची जाणीव ठेवणं गरजेचं आहे. आपण कोणता शब्द कुठे कसा आणि कशासाठी वापरतोय त्या नुसार त्याच महत्व अथवा थिल्लरपणा जाणवत असतो.आपण परिपक्व आहेत कि थिल्लर आहेत हे आपल्या सुमधुर वाणीतुन बाहेर पडलेल्या शब्दा नुसार ठरत असतं.आणि हे आपण स्वतः सोडता इतरांना समजतं वास्तव आहे.हे गणित जेव्हा आपल्याला समजेल तेव्हा आपल्या वाणीतून प्रकट होणारा प्रत्येक शब्द प्रभावी व दर्जेदार बाहेर पडेल. पण दुर्दैवाने हे गणितच आपल्याला कळत नाही. आपल्या वाणीतून प्रकट होणारा प्रत्येक शब्द तोलामोलाचा आणि दर्जेदार,व प्रभावी बाहेर पडणं अपेक्षित असेल तर आपलं आचरण चरित्र आणि शब्द याचा त्रिवेणी संगम झाला पाहिजे हा संगम झाल्याखेरीज आपली वाणी प्रभावी होणार नाही.**

वाणी प्रभावी करण्या ऐवजी सध्या आपण ती अपवित्र कशी होईल यासाठीच जास्त प्रयत्नशील असतो.वैचारीक तात्विकता आज धुळीस मिळाली आहे.परिणाम स्वरूप टिका टिपणीचा स्तर एवढा खालवला आहे.हि ऐकणारा काणावर बोट ठेवत आहे.पण बोलणारा हे समजायला तयार नाही.रेडयांची टक्कर लागल्यावर जसे ते बेधुंद होऊन कोणाचे तरी शिंग मोडल्या शिवाय थांबत नाहीत तसं शब्दांच झालं आहे.आपल्या पवित्र अशा वाणीतुन बाहेर पडणारा प्रत्येक शब्द तोलामोलाचा आणि विचार पुर्वक असला पाहिजे.वाणी हि पवित्र असली पाहिजे.आपली वाणी अपवित्र होणार नाही याची काळजी दक्षाता आपण घेतलीच पाहिजे.पण सहसा असं होतं नाही.आति घाई संकटात नेई त्या प्रमाणे मानवी मनाची अवस्था विद्यमान स्थितीत झाली आहे.आरे ला कारे म्हणजे ज्ञान नाही. इतरांच मत आपण समजून घेण्यासाठी ऐकतोय कि उत्तर देण्यासाठी ऐकतोय हेच गुह्य समजायला तयार नाही.मुळात आपल्या कानावर पडणारा प्रत्येक शब्द हा आपणं प्रथम समजुन घेतला पाहिजे. समजुन घेण जास्त गरजेच आहे. उतर देणं हे फार आवश्यक अथवा महत्वपूर्ण नाही.पण आपण समजुन घेण्या ऐवजी उत्तर देण्यासाठी आतुर असतो.याचा अर्थ काय तर खरया अर्थाने आपण कोणत्याही पातळीवर परिपक्व नाहीत.पण आपण स्वतः परिपक्व नाहीत हि बाब इतरांना जाणवली वाटली तरी हेच सत्य आपल्या मनाला कोणत्याही परिस्थितीत पटणार नाही.मग उपयोग तो काय आणि कसा काल आपण ज्यांचा भौतिक दर्जा पाहुण आपण ज्यांना मोठी माणसं समजतो हिच मोठी माणसं अगदी शाळेतील मुलं बोलतात त्या प्रमाणे सार्वजनिक पातळीवर बोलतात मग हि निव्वळ करमणूक होत आहे.पण या मधून आदर्श तो काय घेणार.सार्वजनिक पातळीवर विचार व्यक्त होत असताना या विचारांना एक दर्जा असला पाहिजे.हाच विचारांचा दर्जा अनेक पिढ्यांसाठी दिशादर्शक ठरत असतो.विचार कोणाचे आहेत हे विचारानुसार ठरत.मत मतांतर असलीच पाहिजेत असणं गरजेचं आहे पण हि मत मतांतर व्यक्त होताना तत्विकता धुळीस मिसळता कामा नये.मुळात व्यक्तिगत पातळीवर असो कि सार्वजनिक पातळीवर पण बोलण्या अगोदर अनेकदा विचार करणं गरजेचं आहे. आणि जर इतरांच्या मतांवर मत व्यक्त करयाच असेल तर मग अगोदर ते मत समजण्यासाठी ऐकलं पाहिजे प्रतिक्रिया देण्यासाठी नाही. ऐकलेल मत प्रतिक्रिया देण्यासाठी ऐकलं तर मग वैचारिकता तात्त्विकता यांचा कुठेही काही ही दुर दुर पर्यंत संबंध येणार नाही.क्रिया आणि प्रतिक्रिया ह्या परस्पर विरोधी घटना घडामोडी आहेत.पण वैचारिक स्तरावर जेव्हा प्रतिक्रिया हि बाब येते.तेव्हा शब्द हे रत्न असावेत.विवेक सारथी असावा.निती न्याय धर्म सदाचार संस्कार हे सहयोगी साथीदार असतील तर आपल्या वाणीचा स्तर हा कधीच खालवणार नाही. वाणी हि मुळात पवित्र असते आणि हिच पवित्रता जपली आणि जोपासली जाण आवश्यक असतं. हिच पवित्रता जीवन सार्थक करत असते.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# महिला मतदारांचा टक्का वाढीसाठी जिल्हाधिकारी सरसावल्या

## रिठद येथे जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांचे महिलांना आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** आगामी लोकसभेच्या निवडणुका मध्ये महिला मतदारांचा टक्का वाढविण्यासाठी प्रशासनाकडून सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत या अनुषंगाने रिठद येथे महिला मतदान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस होत्या तर प्रमुख उपस्थितांमध्ये उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर , रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर होत्या प्रथम सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली सदर कार्यक्रमाचे आयोजन येथील जिल्हा परिषद शाळा क्रमांक एक मध्ये करण्यात आले होते यावेळी जिल्हाधिकारी यांनी महिलांना मार्गदर्शन करून लोकशाहीत मतदानाचे महत्त्व पटवून दिले मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी आपण आपला हक्क बजावावा व दुसऱ्यालाही प्रोत्साहित करावे असे आवाहन केले. यावेळी जिल्हाधिकारी यांनी मार्गदर्शन करतांना सर्व महिलांच्या तोंडून आपण मतदान करणार आहात का? असे वदवून घेतले. शालेय विद्यार्थ्यांमधील युवा मतदार यांनाही लोकशाहीला मजबूत करण्यासाठी मतदान करावे असे आवाहन केले आपण सर्वांनी मतदान करून आपला अधिकार सिद्ध करावा आपण मतदान करताना स्वतःच्या बुद्धीने करा कुणाचाही सल्ला घेऊ नका सल्ला सर्वांचा घ्या



पण मनाने मतदान करा आपले मतदान करतांना कोणालाही हे माहित पडत नाही की आपण कुणाला मतदान केले. त्यासाठी मतदानाचे दिवशी सकाळीच आपण मतदान करून आपल्या शेजाऱ्यांना सुद्धा मतदान करण्यासाठी सोबत आणावे व जास्तीत जास्त महिलांचा टक्का वाढला पाहिजे. असे आवाहन केले. यावेळी उपविभागीय अधिकारी देवकर व तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन राजेंद्र आरू यांनी केले. तर प्रास्तविक केंद्रप्रमुख हनुमान बोरकर यांनी केले. नोडल अधिकारी म्हणून कोकाटे व संतोष भिसडे हे उपस्थित होते व या कार्यक्रमाचे नियोजन भगवान बोरकर केंद्रप्रमुख हनुमान बोरकर व शाळेतील सर्व शिक्षक वृंद व केंद्रातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, महसुलचे तलाठी मुठाळ,दुबे, गोटे उपस्थित होते.



# वारकऱ्यांसाठी व्हेज बिर्याणी, पुरी भाजी

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** कृषी जगत,प्रारब्ध फाऊंडेशन, लोहीया परीवार, जितु परदेशी यांच्या कडुन वारकऱ्यांना षष्ठी सोहळ्या निमित्ताने पुरी भाजी, व्हेज बिर्याणी, फराळ देण्यात आले. गेल्या आनेक वर्षांपासून पैठण शहरातील कमानी शेजारील पाटील कॉम्प्लेक्समधील कृषीजगत परिवार एकत्र येत नाथषष्टी यात्रा काळात लाखो वारकऱ्यांना तीन दिवस पुरी भाजीचे भरपेट भोजन देतात. यासाठी कृषीजगतचे संचालक रामेश्वर सुसे यांचासह शेतकरी, दुकानदार,व मित्र कंपनीच्या सहकार्याने नाथषष्टी सोहळ्यात पुरी भाजीच्या माध्यमातून आन्नदान केले तर प्रारब्ध फाऊंडेशनच्या वतीने गेल्या दोन वर्षापासून व्हेज बिर्याणीचा बेत ठेवला जातो. प्रारब्ध फाऊंडेशनचे अध्यक्ष शिवराज पारिक व मित्र परिवार शिवाजी भाग्यवंत, सचिन उंडाळे, किशोर चौधरी, जनार्दन मिटकर,गणेश वाघमोडे, मंगेश कुलकर्णी, पिंटू देवा, यश राजपूत यांनी व्हेज बिर्याणीचे वाटप केले. तसेच शहर राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने खंडोबा चौकात फराळाचे वाटप करण्यात येत आहे. सेवा म्हणून पैठण शहर राष्ट्रवादी कांग्रेसचे शहराध्यक्ष जितुभाऊ परदेशी, नगरसेवक बंजरग लिबोरे व राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाचे पदाधिकारी व जितुभाऊ परदेशी मित्र मंडळाच्या वतीने सलग तिन दिवस फराळाचे वाटप करण्यात आले. नाथ वाड्यासमोर लोहीया परीवाराने आलेल्या वारकरी भाविकांना भरपेट पुरी भाजीची पंगत दिली. त्यामुळे कृषी जगत, प्रारब्ध फाऊंडेशन, जितु परदेशी,लोहीया परीवार यांच्या माध्यमातून नाथ षष्ठी सोहळ्यात आन्नदानाची अखंड परंपरा चालु झाली आणि यातुन वारकऱ्यांची सेवा घडते हाच आनंद याच्यातुन पाहावयास मिळतो.

**रामकृष्ण आश्रम मोफत आरोग्य तपासणी :** षष्ठीत दरवर्षी प्रमाणे मोफत उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते . संभाजीनगर आश्रम प्रमुख स्वामी परामृतानंद, विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अक्षय पा .शिसोदे यांच्या कल्पनेतून व सहकार्याने या शिबिराचे आयोजन करण्यात येते .यात्रेत तीन दिवस संभाजी नगर येथील तज्ञ डॉक्टर यांची टीम या शिबिरात सेवा देत असून . मोठ्या प्रमाणावर मोफत औषधी वाटप करण्यात आली असुन हजारो वारकऱ्यांनी या शिबिरात लाभ घेतला असल्याची माहिती प्रा .संतोष गव्हाणे यांनी दिली . या शिबिरामधे महात्मा गांधी मिशन संभाजीनगरचे तज्ज्ञ डॉक्टर्स डॉ .नाडगे .डॉ . अंबुलगेकर डॉ .शहा .डॉ चिखलीकर, हेडगेवार हॉस्पिटलचे डॉ . घुगे, डॉ . अजय निधा, डॉक्टर रझ्ञा यांचे सह मोफत औषधी साठी सहकार्य करणारे राजेंद्र भंडारी .प्रा . चंद्रकांत गायकवाड, प्रा . सतिष सराफ, सोमानाथ टाक ,चंद्रशेखर उपाधे आदिनी सहकार्य केले . या शिबिरास जिल्हाधिकारी दिलीप स्वामी उपविभागीय अधिकारी बाफना मॅडम तहसीलदार सारंग चव्हाण, मुख्याधिकारी संतोष आगळे यांनी ही भेट दिली ,शिबिराच्या यशस्वी ते साठी श्री नाथ हायस्कूलचे कर्मचारी प्रयत्न करत आहेत .





# आदित्य एकलारे नवोदय परीक्षेत उत्तीर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** शहरातील ग्लोबल इंग्लिश स्कूलमधील इयत्ता पाचव्या वर्गात शिक्षण घेणारा आदित्य अविनाश एकलारे याने नवोदय परीक्षेत उतीर्ण होत यश संपादन केले.

ग्लोबल शाळेत पाचव्या इयत्तेत शिक्षण घेणारा आदित्य याने जवाहर नवोदय विद्यालयाच्या पूर्व चाचणी परिक्षेसाठी जिद्द, मेहनत, चिकाटी व सातत्यपूर्ण अभ्यासाच्या बळावर नवोदय विद्यालयाच्या पूर्व चाचणी परिक्षेत घवघवीत यश संपादन केले. त्याच्या यशासाठी ग्लोबलचे मुख्याध्यापक एन. मनोज कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली कपिल शेट्टे, काशिनाथ पांचाळ, अमोल



थावरे, नईम खान, हेमा चालीकवार, विद्या दाभाडे, अकीब हामीद, अनुप कुमार, नंदिराम गिरी, तेजस सोनटक्के, अनिल बाबर, कौशल्या क्षिरसागर, शैलजा देशमाने, आशा चापोले, विद्या सकनुरे, भारत ढगे, पूजा ढगे, ज्योती माकणीकर, ज्योती तरटे, अर्चना निलावार, स्वप्नाली दिलेराव, प्रसाद राठोड, अवंती पारेकर, शिवनंदा पांचाळ आदी गुरुजनानी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष संजय मोटे, सचिव डॉ. दीपक मोटे, दिनेश मोटे आदींनी कौतुक केले.

# कन्नड ग्रामीण रुग्णालयाला राज्य शासनाकडून एक लाखाचा पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** ग्रामीण रुग्णालयाने जिल्हयात प्रथम पारितोषिक मिळवून 96.43 गुण मिळवत राज्यात सहावा क्रमांक प्राप्त केला. कायाकल्प ही योजना शासनाने मे 2015 पासून सुरु केलेली आहे.

या कायाकल्प योजने मध्ये रुग्णालय स्वच्छता , कचरा निर्मुलन, जतुसंसर्ग प्रतिबंध, आवार स्वच्छता, रुग्णाला दिलेल्या सुविधा विशेषतः गरोदर माता व लहान मुले.

अद्ययावत अभिलेखे तपासणीसाठी इतर जिल्हयातून डॉक्टरांची पथके येऊन रुग्णालयाची तपासणी करतात. यादीत असलेल्या मानांकनानुसार सर्व बाबी वस्तुनिष्ठपणे तपासून 100 पैकी गुणाकंन करतात. या गुणाकनात कन्नड ग्रामीण रुग्णालय व ट्रामा केअर सेंटर 96.43% गुण मिळवून जिल्हयात प्रथम तर राज्यात सहावा क्रमांक मिळवल्या बद्दल शासनाकडून एक लाख रुपयाचे पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे. डॉ. दयानंद मोतीपवळे जिल्हा शल्यचिकित्सक , डॉ. प्रशांत बडे




निवासी वैद्यकीय अधिकारी , डॉ. प्रज्ञा सोनवणे लक्ष्य समन्वयक ,डॉ. वासेफ शेख जिल्हा गुणवत्ता आश्वासन समन्वयक यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय अधिक्षक डॉ. प्रविण पवार आणि त्यांचे सर्व सहकारी वैद्यकीय आधिकारी व संपूर्ण ग्रामीण रुग्णालय स्टाफ याच्या मेहनतीमुळे तसेच शिस्तबध्दता, रुग्णसेवा भाव, तत्पर सेवा, स्वच्छता यामुळे हे यश संपादित करता आले. ग्रामीण रुग्णालय कन्नडचे समाजातील सर्व स्तरावरुन अभिनंदन करण्यात येत आहे. कन्नड ग्रामीण रुग्णालय मागील वर्षभरापासून आयुष्यमान भव कैम्प, सर्जिकल व डेन्टल कॅम्प घेऊन नेहमीच ग्रामीण भागातील गोरगरीब रुग्णांसाठी तत्पर सेवा देऊन आपले नाव जिल्हयात प्रथम कसे राहील यासाठी सतत प्रयत्नशील व कार्यतत्पर असतो . वेळोवेळी वरिष्ठांनी केलेले मार्गतर्शन या प्रसंगी मोलाचे ठरते.

# पो.नि. प्रमोद पाटलांच्या पथकाची दमदार कामगिरी; ६ तासांत चोरीचा गुन्हा घडकीस

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तालुक्यातील आर्वी येथील कन्यादान मंगल कार्यालयात लग्न सोहळ्यात शिरुन सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा दोन लाख १९ हजार ९०० रुपये किमतीचा ऐवज लांबवणाऱ्या मालेगावच्या दोघा संशयीत चोरट्यांना अवघ्या ६ तासांत पकडून मुद्देमाल हस्तगत करण्यात धुळे तालुका पोलीसांना यश आले आहे. सदर ही कामगिरी तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली आहे. या संदर्भात कोदंडपाणी उर्फ राहुल राजेद्र कुलकर्णी (वय-३२) व्यवसाय पुरोहीत राहणार आर्वी धुळे यांनी तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. ३० मार्च रोजी आर्वी येथील कन्यादान मंगल कार्यालयात भाऊ गणेश राजेंद्र कुलकर्णी यांचा विवाह सोहळा होता. या ठिकाणी अज्ञात चोरांनी 1 लाख ९५ हजार रुपये किंमतीच्या तिन तोळा वजनाच्या दोन सोन्याच्या बांगड्या प्रती तोळा ६५००० रुपये व १९ हजार ५०० रुपये किमतीचे तिन ग्रॅम वजनाचे दोन कानातले टॉगल प्रति ग्रम ६५०० रुपये, व ४०० रुपये किंमतीचा एक सोन्याचा मनी, व ४ हजार रुपयांची रोख रक्कम, 1 हजार रुपये किंमतीची एक रुबज कंपनीची हातातील घड्याळ असा एकुण 2 लाख १९ हजार ९०० रुपये किमतीचा ऐवज लांबवीला. या प्रकरणी धुळे तालुका पोलिसांत गुन्हा दाखल झाला. या घटनेची माहीती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी साजन सोनवणे, पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील यांनी घटनास्थळी भेट दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील यांनी पोलिस उपनिरीक्षक विजय देवराम पाटील यांच्यासह पथकाला तपासासाठी रवाना केले. त्यांनी गोपनिय यंत्रणा सतर्क करून सीसीटीव्ही फुटेज तपासून आर्वी गाव परिसरात तपास करुन अवघ्या 6 तासांच्या आत चोरी उघडकीस आणली. यात मुख्य सुत्रधार आणि आरोपी मोहम्मद सोयब मोहम्मद सलिम (वय २६) राहणार मालेगाव व मोहम्मद रफिक मोहम्मद शराफत अली सिध्दीकी (वय १९) राहणार मालेगाव यांना दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून चोरीस गेलेला मुद्देमाल त्यात रोख रक्कम आणि सोन्याचे दागिणे हस्तगत करण्यात आले आहे. ही कामगिरी पोलिस अधिक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलिस अधिक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलिस अधिकारी साजन सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पो निरीक्षक प्रमोद पाटील, उप निरीक्षक विजय पाटील, हेड कॉन्स्टेबल कुणाल पानपाटील, मनोज तवर, विशाल पाटील,कुणाल शिंगाणे, धिरज सांगळे, निलेश पाटील, राजु पावरा यांनी केली आहे.



# श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाचे मूल्यसंस्कार घरोघरी अभियान

## 87 हजार घरांना भेटी देऊन साधला संवाद

आधुनिक केसरी न्यूज

**बाजीराव सोनवणे**

**नाशिक :** दिंडोरी येथे प्रधान केंद्र असलेला अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा मार्ग व त्र्यंबकेश्वर येथील श्री स्वामी समर्थ गुरुपीठाच्या वतीने हाती घेण्यात आलेल्या "मूल्यसंस्कार घरोघरी "या अभियानांतर्गत महिला पुरुष सेवेकऱ्यांनी 1ते 31 मार्च या कालावधीत 87 हजार 270 घरांना भेटी देऊन मूल्यसंस्काराचे महत्व पटवून देण्यासाठी सुसंवाद साधला. हा संवाद साधत असताना नागरिकांकडून उत्साहवर्धक प्रतिसाद लाभल्याची माहिती सेवा मार्गाच्या वतीने नितीनभाऊ मोरे यांनी दिली. हा प्रतिसाद लक्षात घेऊन या अभियानाची मुदत परमपूज्य गुरुमाऊलींच्या वाढदिवसापर्यंत म्हणजे सहा एप्रिल 2024 पर्यंत वाढविण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

एक मार्चपासून सुरू झालेल्या या अभियानात मराठवाड्यात 15 हजार 344,पुणे 12326, पश्चिम महाराष्ट्र 15216,उत्तर महाराष्ट्र 14,972, मुंबई 10477, विदर्भ ११५१९ तर कोकणात 8416 घरांना भेटी दिल्याची अधिकृत नोंद गुरुपिठात झाली आहे. गर्भसंस्कार,शिशु,बाल, युवा संस्कार याबाबत सेवा मार्गात विपुल साहित्य उपलब्ध आहे. अभियानांतर्गत घरोघरी जाऊन मार्गदर्शन करणाऱ्या सेवेकऱ्यांसाठी ही सर्व ग्रंथसंपदा, माहिती व्हिडिओ, ऑडिओ असे सर्व गुरुपीठातर्फे पुरविण्यात येऊन त्यांना प्रशिक्षित करण्यात आले होते. विशेषतः घरातील लहान मुलांशी, युवकांशी, पालकांशी सुसंवाद कसा साधावा आणि त्यांची मानसिकता ओळखून त्यांना मार्गदर्शन कसे करावे याबाबत खास प्रशिक्षण देण्यात आले होते. या प्रशिक्षणाचा खूपच फायदा झाल्याचे दिसून आल्याची माहिती ही नितीन भाऊ मोरे यांनी दिली. ते अधिक माहिती देतांना म्हणाले, श्री स्वामी सेवा केंद्र ही नुसतीच मंदिरे नसून संस्कार केंद्र आहेत. बालसंस्काराला या मार्गात प्राधान्य दिलेले आहे. सद्गुरु मोरेदादांच्या काळापासून बालसंस्कार हे या सेवामार्गाचे महत्त्वाचे ध्येय आहे. व्यक्तीवर आधारित संस्कार करायचे झाले तर ते बाल वयातच होऊ शकतात. बालवयात केलेल्या



संस्कारामुळे बालकाचे भावी जीवनच पूर्णपणे बदलून भावी जीवनात आशादायी, आत्मविश्वासू, अभयवृत्तीचे, परोपकारी, मातृ-पितृभक्त, सहनशील, संयमी, उद्योगी, कुलभूषण, समाजभूषण, दृढ श्रद्धावान, जीवनात नित्य यशस्वी व्यक्तिमत्त्वाचे आणि प्रखर राष्ट्रभक्ती अंगी असलेले युवक तयार होतील याबाबत शंका नाही, संस्काराचा पाया मजबूत होऊन "वृद्धाश्रममुक्त भारत" व्हावा हा एक हेतू सुद्धा या अभियानामागे असून सहा एप्रिल पर्यंत चालणाऱ्या अभियानात एक लाखापेक्षा अधिक घरांना भेटी देण्याचा संकल्प सर्व महिला पुरुष सेवेकऱ्यांनी केला आहे.



# भावीनिमगाव ते पैठण दिंडीचे स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**शहरटाकळी :** शेवगाव तालुक्यातील श्रीक्षेत्र भावीनिमगाव येथील आनंद साधक आश्रम येथील वैकुंठवासी विठ्ठल नाथ महाराजांच्या कृपेने व ह.भ.प. अशोक महाराज बोरुडे यांच्या मार्गदर्शनाखाली निघालेल्या पायी दिंडी सोहळ्याचे शहरटाकळी येथे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. शहरटाकळी येथील हॉटेल व्यवसायिक संजय जाधव परिवार व जगताप परिवार यांच्या वतीने दिंडी चे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले व दिंडीसाठी अल्पवहाराची व्यवस्था करण्यात आली होती, त्याचबरोबर रामकृष्ण गोरे ( सेवानिवृत्त कक्ष अधिकारी पंचायत समिती शेवगाव ) यांच्या वतीने दिंडीसाठी पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी संतोष महाराज पवार, मच्छिंद्र महाराज पानकर, कांता महाराज काळे, ह.भ.प. बारावकर महाराज, गणेश महाराज वाकळे, गणेश महाराज खेडकर, प्रल्हाद महाराज हत्ते, हिंदवी स्वराज्य प्रतिष्ठानचे रामचंद्र गिरम,राजेंद्र खंडागळे, रविंद्र मडके, शेखर जोशी, हरिचंद्र भालके, वसंत कावलेसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या लढ्याला यश

## सोयाबीन भावांतर योजनेसाठी चार हजार कोटींची तरतूद

आधुनिक केसरी न्यूज



तसं पाहिलं तर चार हजार कोटींची तरतूद ही खुप तुटपुंजी आहे . किमान दहा हजार कोटींची तरतूद करण्यात यायला पाहिजे होती . पण, असो फुल ना, फुलाची पाकळी तर मिळाली याचं थोडं समाधान आहे . मात्र प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांच्या हातात पडे पर्यंत अंमलबाजवनी कशी असेल यावर आम्ही विशेष लक्ष देणार आहोत .
**विष्णुपंत भुतेकर, ( संस्थापक अध्यक्ष, भूमिपुत्र शेतकरी संघटना )**

**वाशिम :** शेतकऱ्यांच्या सोयाबीन शेतमालाला कवडी मोल भाव मिळत असल्याने उत्पादन खर्च सुद्धा वसुल होत नव्हता. परिणामी शेतकरी आर्थिक परिस्थितीने हतबल झाले आहेत. त्या अनुषंगाने भूमिपुत्र शेतकरी संघटनेकडून विविध आंदोलनं छेडण्यात आली होती. त्यात भावांतर योजना लागू करण्यासाठी विशेष लढा उभा करण्यात आला होता. अखेर भूमिपुत्रच्या या लढ्याला यश मिळाले असून सदर योजनेसाठी सरकारने चार हजार कोटींची तरतूद केली असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचा सोयाबीनच्या पडलेल्या भावामुळे उत्पादन खर्च सुध्दा वसुल होत नव्हता. त्यामुळे भूमिपुत्र शेतकरी संघटनेकडून व्यापक अदोलंन हाती घेण्यात आले होते. रिसोड येथिल संत अमरदास बाबा संस्थान ते वाशिम जिल्हाअधिकारी कार्यालयापर्यंत अक्रोश पदयात्रा काढण्यात आली होती. सोयाबीनची होळी करून शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणाचा निषेध करण्यात आला. भुमीपुत्रच्या सततच्या पाठपुराव्या मुळे आखेर राज्यात पहिल्यांदाच सोयाबीन पीकासाठी भावांतर योजनेसाठी चार हजार कोटींची तरतुद सरकार कडुन करण्यात आली.

महाराष्ट्रात सर्वाधिक पीकपेरा आणि नगदी पीक म्हणून गेल्या आनेक वर्षापासून शेतकरी सोयाबीन कडे वळले आहेत. पंरतु केंद्र सरकारच्या निवडणूकाभिमुख निर्णयामुळे देशात कच्या आणि रिफाइन्ड खाद्य तेलाची विक्रमी आयात करण्यात आली. विक्रमी आयाती मुळे राज्यातील सोयाबीन चे भाव प्रचंड कोसळले पंधरा वर्षांआधीच्या भावाने सोयाबीन विकण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांबरोबर राज्यातील तेल उद्योगाचे आणि खाद्य तेल उद्योगासी निगडीत व्यापाराचे सुध्दा प्रचंड नुकसान झाले. राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची संख्या पाहता करण्यात आलेली तरतुद किमान दहा हजार कोटींची आपेक्षीत होती. केलेली तरतुद सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या हातात पडे पर्यंतची आमलबजवनी कशी आसेल यावर आम्ही लक्ष ठेवून राहणार भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी प्रसिद्धी पत्रात म्हटले आहे.



# म.ज्योतिबा फुले महाविद्यालयाला नॅकचे 'बी प्लस ग्रेड' प्राप्त

आधुनिक केसरी न्यूज

बल्लारपूर :- महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ बल्लारपूर द्वारा संचालित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय बल्लारपूर येथे दिनांक २० व २१ मार्च २०२४ रोजी नॅक समिती ने भेट दिली होती. या समिती मध्ये आई.जी.एन.ओ.यू दिल्ली चे चेयरमेन प्रो. कुलुगुरु डॉ.किरण हजारिका, देवांगीरी विद्यापीठ कर्नाटक चे सदस्य कोआर्डिनेटर प्रा.डॉ.रंगप्पा के.बी. आणि सदस्य माजी प्राचार्य,पं. एल. एम. एस. स्नातकोत्तर महा.उत्तराखण्ड चे डॉ.एन. डी. माहेश्वरी उपस्थित होते. या समिती ने प्रभारी प्राचार्य डॉ. बादलशाह चव्हाण सह सर्व विभागातील प्राध्यापक आणि कोऑर्डिनेटर प्रा. डॉ. रजत मंडल यांचे सादरिकरण घेण्यात आले .त्यानंतर प्रत्येक विभागाला त्यांनी स्वतः भेट दिली आणि विभागाद्वारे ज्या कमतरता आहे त्या पूर्ण करण्याची सूचना करण्यात आली. तसेच महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संजय भाऊ कायरकर, उपाध्यक्ष राजेश चिताळे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला. प्रभारी प्राचार्य डॉ. बी.डी. चव्हाण यांनी सुध्दा पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

या दोन दिवसाच्या कालावधी मध्ये महाविद्यालय चे माजी विद्यार्थी, विद्यार्थ्यांचे पालक आणि विद्यार्थ्यांशी वैयक्तिकरित्या त्यांनी संवाद केला. माजी विद्यार्थ्यांची संख्या जास्त प्रमाणात होती आणि ते मोठमोठ्या पदावर कार्यरत असल्याचे लक्षात आले. एकंदरीत या दोन दिवसाच्या भेटी दरम्यान त्यांनी समाधान व्यक्त केले आणि भविष्यातही यापेक्षा आणखी पुढे जाऊन महाविद्यालयाला व संस्थेला प्रगतीपथावर नेण्यासाठी शुभेच्छा दिल्या. सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. शुभांगी भेंडे शर्मा यांचा मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. त्यात प्रत्येक राज्याचे ग्रुप डान्स मुले व मुलींद्वारे सादर केले. यानंतर प्रत्येक विभागातील प्राध्यापकांनी आपल्या विभागातील उत्कृष्ट माहिती सांगितली. संस्थेचे अध्यक्ष संजय भाऊ कायरकर, उपाध्यक्ष राजेश चिताळे यांनी महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य , कोऑर्डिनेटर , प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी, सर्व विद्यार्थी, माजी विद्यार्थी, विद्यार्थ्यांचे पालक आणि मान्यवरांचे आभार मानून अभिनंदन केले.



# उमरी ते शिर्डी पदयात्रा रवाना

आधुनिक केसरी न्यूज

**उमरी :** येथून शिर्डीकडे जाणारी पदयात्रा गेल्या तेरा वर्षापासून अविरतपणे सुरू असून यंदाची पदयात्रा दिनांक १ एप्रिल रोजी उमरी येथून शिर्डीकडे रवाना होणार आहे.

या पदयात्रेत जवळपास तीनशे पदयात्री यांचा सहभाग राहणार आहे. उमरी तालुक्यातील श्रीक्षेत्र गोरठा येथील संतकवी दासगणू महाराज यांच्या नावाने निघणारी ही पदयात्रा दिनांक १ एप्रिलपासून निघणार असून जवळपास ४५० किलोमीटरचे पायी अंतर पंधरा ते सोळा दिवसात पार करण्यात येणार आहे. गेल्या बारा-तेरा वर्षापासून ही पदयात्रा अविरतपणे सुरू असून यंदाही पदयात्रेची जोरदार तयारी सुरू झाली आहे. गोरठा येथील संतकवी दासगणू महाराज यांनी शिर्डी येथील साई बाबांच्या समाधीस्थळाचे जवळपास ३५ वर्ष अध्यक्ष राहिले आहेत. त्यांच्या नावाने ही निघणारी पदयात्रा मानाची पालखी म्हणून परिचित आहे. महाराष्ट्रातील ही मानाची पालखी म्हणून ओळखल्या जाते. १७ एप्रिल रामनवमीस या पालखीचे आगमन शिर्डी नगरीत होणार असून, साईबाबा संस्थानच्या वतीने देखील या पालखीचे भव्यदिव्य स्वागत करण्याची परंपरा सुरू आहे. यंदा शिर्डी साईबाबा संस्थानचे विश्वस्त सुरेशराव वाबळे पाटील यांच्यासह साईबाबा संस्थानचे विश्वस्त व पदाधिकारी या पालखीचे स्वागत करणार आहेत. पदयात्रेत मुख्य प्रवर्तक विष्णू अट्टल, अध्यक्ष गोपाळ राठोड, कार्याध्यक्ष अशोक मामीडवार, कैलासभाऊ देशमुख गोरठेकर, प्रवीण सारडा, संभाजी सावंत, गजानन श्रीरामवार, सुभाष गोरठेकर, राम येरावार, उपाध्यक्ष महेश नगनुरवार, परमेश्वर मुदिराज, उद्धव मामडे, संतोष हैबतकर, संजय चुनुपवाड, बाळू महाराज काचावार, राम रोन्टे, साईनाथ ढगे पाटील, तमलुर भावजी आदींसह जवळपास ३०० पदयात्रेत सहभागी राहणार आहेत दिनांक १ एप्रिल रोज सोमवार सकाळी ७ वाजता जुनी उमरी शहरातील साईबाबा मंदिरात पूजन आरती करून पदयात्रेला सुरुवात होणार.

# केंद्रीय आरोग्य सचिवांची उपकेंद्राला भेट

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** तालुक्यातील टाकळी प्राथमिक आरोग्य केंद्रा अंतर्गत येणाऱ्या ब्राम्हणगाव उपकेंद्राला केंद्रीय आरोग्य मंत्रालयाचे मुख्य सचिव अपूर्वा चंद्रा यांनी नुकतीच भेट देऊन आरोग्य मंत्रालया अंतर्गत सुरू असलेल्या विविध योजनांची माहिती घेतली.

यावेळी राज्य आरोग्य विभागाचे अतिरिक्त संचालक डॉ. बाविस्कर, पुणे येथील कुटुंब कल्याणचे उपसंचालक डॉ गोविंद चौधरी, नाशिक विभागीय उपसंचालक डॉ कपिल आहेर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ संजय घोगरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ बापूसाहेब नागरगोजे, कोपरगाव तालुका आरोग्य अधिकारी डॉ विकास घोलप आदींसह टाकळी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, उपकेंद्र अंतर्गत येणारे समुदाय आरोग्य अधिकारी, व आरोग्य विभागातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. केंद्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या अंतर्गत चालू असणाऱ्या विविध योजनांची ग्रामीण पातळीवर योग्य तऱ्हेने अंमलबजावणी होते किंवा नाही तसेच आरोग्य विभागाच्या जवळ जवळ सर्वच योजना आता ऑनलाईन पद्धतीने त्याची नोंदणी होत असते




त्यामुळे प्रत्यक्षात नोंदणी व ग्रामीण स्तरावर होणारे काम याचा आढावा घेण्यासाठी ही भेट असल्याची माहिती मिळाली आहे.

दिनांक ३०/०३/२०२४ रोजी दिलेल्या या भेटीमध्ये त्यांनी उपकेंद्र इमारत अंतर्गत स्वच्छतेची पाहणी तसेच उपकेंद्रांतर्गत सुरू असलेली ऑनलाइन कामे जसे की एनसीडी पोर्टल, आरसीएस पोर्टल, एच आय एम आय एस, आय डी एस पी या संदर्भात ऑफलाइन व ऑनलाईन लाभार्थ्यांना देण्यात येणारे लाभ बरोबर आहेत का याची खातर जमा करून माहिती घेतली तसेच कामकाजात आणखी सुधारणा व्हावी या दृष्टीने सूचना केल्या.

यावेळी आर सी एच अंतर्गत सुरू असलेल्या कामाची माहिती आरोग्य सेविका मैद एस एस यांनी दिली तसेच आशा सेविका समवेत त्यांच्या कामा संदर्भात देखील चर्चा केली.

डॉ. अनिकेत खोत, डॉ. श्रीमती पठाण, समुदाय आरोग्य अधिकारी संकेत पोटे, आरोग्य सेवक श्याम गावडे यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

# पुण्यात कोयता गँग पुन्हा सक्रिय

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** मार्केट यार्ड भागातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरनगर परिसरात टोळक्याने कोयते, तलवारी उगारून दहशत माजविल्याची घटना घडली. टोळक्याने एका तरुणाला जीवे मारण्याची धमकी दिली. घराच्या दरवाज्यावर कोयते आपटून नागरिकांना शिवीगाळ केली. याप्रकरणी राहुल उर्फ लल्या कांबळे (वय १९), शुभम कांबळे (वय २०), डुई ताकतोडे (वय २१), जग्या (चौघे रा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरनगर, मार्केट यार्ड) यांच्यासह तीन ते चार साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबत अरशद इस्माइल बागवान (वय १९, रा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरनगर, मार्केट यार्ड) याने मार्केट यार्ड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. बागवानच्या भावाचा आरोपींशी वाद झाला होता. आरोपी रात्री बागवानच्या घराजवळ आले. त्यांनी तलवारी आणि कोयते उगारून दहशत माजविली. बागवानचे वडील, तसेच शेजारी राहणारे शालम शेख यांना कोयत्याचा धाक दाखविला. आम्ही आंबेडकरनगरचे दादा आहोत, अशी धमकी देऊन घराच्या दरवाज्यावर कोयते आपटून दहशत माजविली. पसार झालेल्या आरोपींचा शोध घेण्यात येत असून, सहायक पोलीस निरीक्षक मदन कांबळे तपास करत आहेत.

# धार्मिक कार्यातील योगदानाबद्दल बाळकृष्ण महाराज कुलकर्णी यांचा गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** विविध धार्मिक कार्यात वेदमंत्राचा जयघोष करत शास्त्रोक्त पद्धतीने कोणतेही धार्मिक कार्य यशस्वी करत धार्मिक क्षेत्रात देत असलेल्या योगदाना बद्दल नेवासा तालुक्यातील अंमळनेर येथील हनुमान भक्त बालब्रम्हचारी ज्योतिषशास्त्र तज्ञ बाळकृष्ण महाराज कुलकर्णी यांचा नुकताच गौरव करण्यात आला.

राहुरी तालुक्यातील खुडसरगाव येथे कालभैरवनाथांची मूर्ती, गणेशमूर्ती, विठ्ठल रुक्मिणी मूर्ती, महालक्ष्मी मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठा निमित्ताने शास्त्रोक्त पध्दतीने धार्मिक कार्यक्रमाचे पौरोहित्य वेदमंत्राच्या जयघोषात यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल समस्त ग्रामस्थांच्या उपस्थितीत सालेवडगाव येथील महंत रामानंदगिरी महाराज यांच्या हस्ते हनुमान भक्त बालब्रह्मचारी ज्योतिषतज्ञ तसेच राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्कार प्राप्त केलेल्या बाळकृष्ण महाराज कुलकर्णी यांचा गौरव सत्काराच्या द्वारे करण्यात आला. नेवासा व राहुरी तालुक्यातील खेडोपाडी अखंड हरिनाम सप्ताह असो की मूर्ती प्राणप्रतिष्ठा अशा ठिकाणी बाळकृष्ण कुलकर्णी महाराज हे आवर्जून हजेरी लावतात. धार्मिक शास्त्रानुसार पौरोहित्य करून ते धर्म कार्य करतातच शिवाय हनुमान उपासक असल्याने आपल्या बुद्धी चातुर्याच्या जोरावर ज्योतिष शास्त्रानुसार संकटात सापडलेल्यांना देखील योग्य मार्ग दाखविण्याचे देखील ते काम करत असल्याने ते कुलकर्णी महाराज नावाने लोकप्रिय झाले आहे.





# ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. के. एच. वाखुरे यांना वृद्धाश्रमाचा सामाजिक कार्य गौरव पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** येथील न्यायालयातील जेष्ठ विधी तज्ञ ॲड. के. एच. वाखुरे सर यांना नेवासा खडका रोडवर असलेल्या शरणपूर वृध्दाश्रमाच्या वतीने सामाजिक कार्य गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

समाज हितासाठी नेहमी पुढे येऊन प्रत्येक कार्यात सहभाग नोंदवत देत असलेल्या योगदानाबद्दल तसेच भारत सरकारच्या नोटरी पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांच्या कार्याची दखल घेत ॲड. के. एच. वाखुरे यांना सामाजिक कार्य गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

वृद्धाश्रमात झालेल्या पुरस्कार प्रदान कार्यक्रम प्रसंगी सेवानिवृत्त नायब तहसीलदार चंद्रकांत कांदे, पुणे येथील सामाजिक कार्यकर्ते अजय कुलकर्णी यांच्या हस्ते सदरचा पुरस्कार वाखुरे सर यांना प्रदान करण्यात आला.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब वाघ,रामदास अवचरे, मुळा कारखान्याचे संचालक निलेश पाटील,प्रकाश निपुंगे, राजू शेख, सौ. पुष्पाताई अवचरे, शिक्षिका मीनाक्षी अवचरे, संतोष मगर, शरद चव्हाण, वृद्धाश्रम चालक रावसाहेब मगर, वृद्धाश्रम कमिटीचे अध्यक्ष पत्रकार बाळासाहेब देवखिळे, संपर्क प्रमुख पत्रकार सुधीर चव्हाण यांच्यासह वृद्धाश्रमातील आजी आजोबा उपस्थित होते.

# केशर आंबा यंदा महिनाभर आधीच बाजारात

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** राज्यातील केशर आंबा साधारण एप्रिलअखेर किंवा मे महिन्याच्या सुरुवातीस बाजारात येतो. मात्र, यंदा मार्चअखेरीस केशर बाजारात दाखल झाला असून, एप्रिलच्या पहिल्या आठवड्यापासूनच मोठ्या प्रमाणावर केशर आंबा बाजारात उपलब्ध असेल. वाशी कृषी उत्पन्न बाजार समितीतील फळांचे व्यापारी संजय पानसरे म्हणाले, सांगोला, धाराशिव, मराठवाडा, खानदेशातील केशर आंबा मुंबई, पुण्याच्या बाजारात दाखल झाला आहे.


केशरला १५० ते १७० रुपये किलो दर मिळत आहे. केशर मार्चच्या अखेरीस किरकोळ प्रमाणात बाजारात आला. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यापासून मोठ्या प्रमाणावर केशर बाजारात दाखल होईल. यंदा केशरला चार-पाच टप्प्यात मोहोर आला आहे. एकाच झाडावर काढणीला आलेला, पक्व झालेला आंबा, कैरी स्वरुपातील आंबा, लिंबाच्या आकाराचा आंबा आणि नुकताच मोहरातून बाहेर येऊन लिंबोळीच्या आकाराचा आंबा दिसत आहे. पहिल्या टप्प्यातील मोहरापासून आलेल्या आंब्याची काढणी पंधरा एप्रिलपासून सुरू झाली आहे. यंदा मार्चच्या मध्यापासून जूनअखेरपर्यंत केशर आंबा बाजारात असेल, अशी माहिती महाकेशर आंबा बागायतदार संघाचे अध्यक्ष डॉ. भगवानराव कापसे यांनी दिली.

# नाथ वंशजातील वाद मिटला हे धांदात खोटे

## वासुदेव बुवा जहागीरदार पैठणकर

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** दोन दिवसापूर्वीच्या



स्थानिक वर्तमानपत्रातून पैठण जिल्हा संभाजीनगर इथून एक बातमी प्रसिद्ध करण्यात आली त्यात स्वयंघोषित संस्थानिक रावसाहेब महाराज गोसावी यांनी आपल्या कुठल्याही भाऊ बंदकी ला संपर्क न करता एक पत्रकार परिषद घेतली व त्यामध्ये त्यांनी खोटी माहिती सांगून संपूर्ण समाजाची दिशाभूल करणारी बातमी प्रसिद्ध केली असून सदर बातमी मुळात खोटी असून त्याचा खुलासा करणे आवश्यक आहे. या बातमीमधील रघुनाथ नारायण गोसावी स्वतःला नाथाचे वंशज म्हणून घेतात पण वास्तविक ते कधीही वंशज नव्हते व त्यांनी खोट्या नावाने कोर्टाची दिशाभूल केलेली आहे व त्यामुळे समाजामध्ये गैरसमज पसरून आहे म्हणून त्याचा खुलासा करणे हे क्रम प्राप्त आहे सदर रघुनाथ नारायण गोसावी हे कधीही नाथ वंशस्त नव्हते, फक्त त्यांनी खोट्या नावाने स्वतःला नाथ वंशज करून घेतले आहे, व ते नाथ वंशजची व इतर लोकांची फसवणूक करीत आहेत तसेच दिशाभूल करत आहेत.

याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे कारण अजून हा वाद कोर्टात प्रलंबित आहे त्यामुळे हा वाद मिटलेला नाही तरी त्यांनी कोणालाही



विश्वासात न घेता पत्रकारांना चुकीची माहिती देऊन पांडव व गोसावी यांच्यातील वाद मिटलेला आहे असे घोषित केले, ही चुकीची माहिती देऊन त्यांनी समाजाची दिशाभूल केली आहे याकरिता मी ही पत्रकार परिषद घेतलेली आहे असे नाथ वंशज वासुदेव बुवा जहागीरदार पैठणकर यांनी छत्रपती संभाजीनगर येथे सांगितले.

# धाराशिवचा महायुतीचा उमेदवार..! महायुती करून राष्ट्रवादीला जागा..!

आधुनिक केसरी




सचिन कोरडे

देशामध्ये होत असलेल्या आगामी लोकसभा निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापले जात आहे. निवडणुकीचे पडघम वाजल्यापासून नेत्यांचे आरोप-प्रत्यारोप चिखल फेक सुरू झालेली आहे. महाराष्ट्र मध्ये बहुतांश ठिकाणी महाविकास आघाडी ,महायुती, वंचित या पक्षांचे उमेदवार जाहीर केले जात आहेत. मात्र तिसऱ्या टप्प्यामध्ये मतदान होणाऱ्या धाराशिव जिल्ह्यामध्ये मात्र महायुतीकडून उमेदवारीचा आजपर्यंतचा तिढा कायम होता. इथे महाविकास आघाडी कडून ठाकरे गटाचे ओमराजे निंबाळकर यांना अगोदरच उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. ओम राजे निंबाळकर यांनी प्रचाराची धुरा हाती घेत गाव बैठकीला सुरुवात देखील केली आहे, तर शिंदे सेने कडून धाराशिव लोकसभा शिवसेनेचा खासदारकीचा बालेकिल्ला समजला जातो. त्यामुळे स्वतः पालकमंत्री व महाराष्ट्र आरोग्य मंत्री उमेदवारीसाठी आग्रही आहे. त्यांच्याकडून तानाजी सावंत आणि त्यांचे पुतणे धनंजय सावंत हे दोन नाव चर्चेत आहे. भाजपनेही या मतदारसंघात चांगलीच मोट बांधण्याचे काम







केल्याचे दिसून येत आहे. भाजपही तिकिटासाठी आग्रही आहे. भाजपकडून तुळजापूरचे आमदार राणा (जगजीतसिंह) पाटील, मैत्रचे प्रवीण परदेशी, औसा विधानसभेचे आमदार अभिमन्यू पवार, भाजपा जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य ही नावे आघाडीवर आहेत. त्यातच राष्ट्रवादीने ही धाराशिव मतदार संघासाठी घड्याळाची टिकटिक वाजवली आहे. राष्ट्रवादीकडूनही सुरेश बिराजदार यांनी उमेदवारी मागितली आहे. त्यामुळे वर्षा निवासस्थानावर रोजच संभाजीनगर तसेच धाराशिव या जागेसाठी खलबत्ते होत आहेत.  असे असले तरी महायुतीचा उमेदवार कोण हा धाराशिव करांना पडलेल्या प्रश्नाचे उत्तर लवकरच मिळण्याची शक्यता आहे.  कारण होत असलेल्या आगामी 2024 च्या लोकसभेसाठी धाराशिव मधून महायुती कडून उमेदवाराच्या हातात राष्ट्रवादीचे घड्याळ बांधले जाण्याची दाट शक्यता आहे. राष्ट्रवादीकडून सुरेश (दाजी) बिराजदार यांचे नाव जरी आघाडीवर असले तरी ऐनवेळी मैत्रीचे प्रवीण परदेशी यांच्या हातातही घड्याळ बांधले जाऊ शकते.




# नाथषष्ठीत जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत मतदार जनजागृती दिंडी

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** शहरात श्रीसंत एकनाथ महाराज  षष्ठी सोहळा निमित्ताने SVEEP अंतर्गत मतदार जनजागृती कार्यक्रम निमित्ताने भव्य शासकीय दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी विविध. उपक्रम घेण्यात आले. श्री. ओंकेश बनसोडे, किरण गाडेकर, सिद्धार्थ वाघ, प्रमोद कोकाटे, दादासाहेब ठोंबरे, सपाटे सर, सार्थक गवळी यांच्या टीमने मतदार जनजागृती गीत सादर केले.श्री बालाजी विद्यालय, नारळा, श्रीनाथ हायस्कूल, पैठण, आर्य चाणक्य विद्यालय, पैठण,यांनी पथनाट्य सादर केले. मा. जिल्हाधिकारी श्री. दिलीप जी स्वामी साहेब, यांच्या प्रमुख प्रेरणेने ,मा. बाफना मॅडम, उप विभागीय अधिकारी,मा. तहसीलदार श्री. सारंग जी चव्हाण साहेब, तहसीलदार, श्री. देसले साहेब, उपमुख्यकार्यकारी अधिकारी,मा.श्री. संजय जी कुलकर्णी गटविकास अधिकारी, पैठण यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य शासकीय दिंडी पार पडली. या प्रसंगीश्री.राजेश कांबळे,श्री. प्रकाश लोखंडे,श्री. अनिल पुदाट,श्रीमती गहिरवार मॅडम, राहुल बनसोडे, विष्णू घुगे,नायब तहसीलदार, सर्व केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, शिवाजी नवले, गणपत मिटकर, पाखरे साहेब, किशोर निकम, निसर्गन साहेब,दशरथ खराद, जिजा मिसाळ, महसूल अधिकारी, कर्मचारी, ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक, कृषी विभाग, पंचायत विभाग,तलाठी उपस्थित होते. जवळ पास 900 अधिकारी कर्मचारी यात उपस्थित होते.

# श्रीराम साधना आश्रमात संगीतमय तुलसी रामायण कथा सोहळयाची जय्यत तयारी

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** श्रीराम जन्मोत्सवाच्या निमित्ताने नेवासा तालुक्यातील मुकिंदपूर चारी क्रमांक तीन जवळ असलेल्या रामनगर येथील श्रीराम साधना आश्रमामध्ये  दि.११ ते १८ एप्रिल या कालावधीत रामायणाचार्य हभप रामरावजी महाराज ढोक यांच्या सुश्राव्य वाणीतून संगीतमय तुलसी रामायण कथा सोहळयाचे आयोजन करण्यात आले असून या सोहळयाची जय्यत तयारी सुरू असल्याचे सोहळयाचे प्रमुख महंत सुनीलगिरीजी महाराज यांनी दिली.

यावेळी या कथा सोहळयाच्या संदर्भात बोलताना महंत सुनीलगिरीजी महाराज म्हणाले की श्रीराम जन्मोत्सवाच्या निमित्ताने रामायणाचार्य हभप रामरावजी महाराज ढोक यांच्या सुश्राव्य वाणीतून ही कथा दि.११ ते १८ एप्रिल या कालावधीत सायंकाळी ७ ते १० यावेळेत होणार आहे.

या सोहळयाच्या निमित्ताने दि.११ ते दि.१७ एप्रिल या कालावधीत सकाळी १० ते १२ यावेळेत किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून या किर्तन महोत्सवात गुरुवार दि.११ एप्रिल रोजी हभप दयानंद महाराज कोरेगावकर,शुक्रवार दि.१२ एप्रिल रोजी देवगड संस्थानचे महंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज, शनिवार दि.१३ एप्रिल रोजी बीड येथील हभप श्री अमृताश्रम स्वामी महाराज,रविवार दि.१४ एप्रिल रोजी बीड येथील महादेव महाराज राऊत,सोमवार दि.१५ एप्रिल रोजी सावखेडा येथील गिरी आश्रमाचे महंत श्री कैलासगिरीजी महाराज,मंगळवार दि.१६ एप्रिल रोजी भागवताचार्य साध्वी सुवर्णानंद चैतन्य,बुधवार दि.१७ एप्रिल रोजी रामनवमी निमित्त महंत परमहंस मुक्तानंद महाराज वेल्हाळे संगमनेर यांचे किर्तन होणार असून दुपारी १२ वाजता पुष्पवृष्टी करून श्री रामजन्मोत्सव साजरा होणार आहे. गुरुवार दि.१८ एप्रिल रोजी हभप पांडुरंग गिरी महाराज वावीकर यांच्या होणाऱ्या काल्याच्या किर्तनाने आठ दिवस चालणाऱ्या श्री रामजन्मोत्सव व किर्तन महोत्सवाची सांगता होणार आहे.दुपारी ३ वाजता त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलाचे संस्थापक मेजर साहेबराव घाडगे पाटील यांच्या सौजन्याने कुस्त्यांचा जंगी होणार आहे. श्रीरामजन्मोत्सवाच्या निमित्ताने आयोजित संगीतमय  तुलसी रामायण कथा व  होणाऱ्या किर्तन महोत्सवात होणाऱ्या किर्तन श्रवणाचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन महंत सुनीलगिरीजी महाराज यांनी केले आहे.

# रामकृष्ण मिशन आश्रमच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी व औषधी वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** पंधरा वर्षापासून सातत्य पुर्ण रित्या राबविण्यात येत असलेल्या सेवाभावी आरोग्य तपासणी शिबिराचे यंदा ही आयोजन करण्यात आले आहे याचे उद्घाटन रामकृष्ण आश्रमचे स्वामी परामृतानदं यांचे हस्ते करण्यात आले या प्रसंगी विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अक्षय शिसोदे पा हे होते. या शिबिरामधे महात्मा गांधी मिशन संभाजीनगर चे तज्ञ डॉक्टर्स यांचे नेतृत्वात हे शिबिर तीन दिवस चालणार आहे. पहिल्या तासात 200 पेक्षा जास्त पेशंट ची नोंद झाली होती. या मधे डॉक्टर नाडगे, डॉक्टर अंबुलगेकर डॉ.शहा.डॉ चिखलीकर ,हेडगेवार हॉस्पिटलचे डॉ. घुगे, डॉ. अजय निधा, डॉक्टर रझा यांचे सह मोफत औषधी साठी सहकार्य करणारे राजेंद्र भंडारी.प्रा



चंद्रकांत गायकवाड, प्रा. सतिष  सराफ, सोमानाथ टाक, चंद्रशेखर उपाधे आदिनी सहकार्य केले आहे. तीन दिवसात सरासरी तीन हजारा पेक्षा जास्त वरकायांची आरोग्य तपासणी करण्यात येते. या शिबिरास जिल्हाधिकारी दिलीप स्वामी उपविभागीय अधिकारी बाफना मॅडम तहसीलदार सारंग चव्हाण, मुख्याधिकारी संतोष आगळे यांनी ही भेट दिली. शिबिराच्या यशस्वी ते साठी श्री नाथ हायस्कूलचे कर्मचारी प्रयत्न करत आहेत.



# राजूर येथील गौरवी पांडे, श्रावणी दारुवाले, पार्थ सोनवणे यांचे नवोदय परीक्षेत यश

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** येथील गौरवी पांडे आणि श्रावणी दारुवाले आणि पार्थ सोनवणे या विद्यार्थ्यांनी नवोदय परीक्षेत विशेष प्राविण्यासह घवघवीत यश संपादन केले आहे. त्याबद्दल राजूर येथे मित्रपरिवाराच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. शिक्षण विभागाच्या वतीने फेब्रुवारी महिन्यात नवोदय पूर्वपरीक्षा परीक्षा घेण्यात आली होती. नुकताच या परिक्षेचा निकाल जाहीर झाला आहे.

या परीक्षेत राजूरसह परिसरातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे. त्यामध्ये चनेगाव जिल्हा परिषद शाळेतील गौरवी विनोद पांडे, राजूर येथील केंद्रीय प्राथमिक शाळेतील श्रावणी गणेशअप्पा दारुवाले आणि उमरखेड जि. प. शाळेतील पार्थ विजय सोनवणे या विद्यार्थ्यांनी नवोदय चाचणी पूर्वपरीक्षेत यश संपादन केले आहे. परतूर तालुक्यातील आंबा येथील जवाहर नवोदय विद्यालयात त्यांची पुढील शिक्षणासाठी निवड झाली आहे. नवोदयसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा राजूर येथे मित्रपरिवाराच्या वतीने करण्यात आला.

# वेरूळ येथे संगीत नवनाथ कथेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** वेरूळ येथील नाथाश्रमात सद्गुरु अक्काताई महाराज यांच्या आशीर्वादाने आणि प्रमुख उपस्थितीत संगीतमय नवनाथ कथेचे आयोजन करण्यात आले असून सदरील कथा सोमवार दि.१ एप्रिल ते सोमवार दि.८ एप्रिल 2024 पर्यंत आयोजित करण्यात आली आहे.या संगीतमय नवनाथ कथेसाठी प्रसिद्ध कथा प्रवक्ते स्वामी अरुणाथगिरीजी महाराज (मठाधिपती श्रीक्षेत्र अडबंगनाथ संस्थान भामाठाण) यांच्या वाणीतून होणार असून यावेळी कथालेखक निळकंठ तरकासे बाबूजी, संगीतकार कैलास महाराज, दुशिंग ह.भ.प लखनगिरी महाराज, ह.भ.प दीपक महाराज लोंढे, ह भ प सोमनाथ महाराज तळेकर, ह भ प प्रेमनाथ महाराज पवार आणि धर्मनाथ महाराज यांचीही उपस्थिती राहणार आहे. या नवनाथ कथेदरम्यान नवनाथ पारायण आणि एककुंडात्मक विष्णू याग विष्णुसहस्रनाम ही होणार असून यावेळी संत महंतांची प्रमुख उपस्थिती व संत महंत पूजन ही करण्यात येणार असल्याची माहिती आश्रमाच्या वतीने देण्यात आली आहे. या सप्ताहाचा दैनंदिन कार्यक्रम पहाटे ४ ते ५ काकडा भजन, ६ ते ७ सद्गुरूंची आरती, ८ ते १२ श्री नवनाथ ग्रंथ पारायण, दुपारी १२ ते १ गाथा भजन, ३ ते ४ प्रवचन, ४ ते ६ हरिपाठ, ६ ते ७ सद्गुरूंची आरती, रात्री ७ ते ९ संगीतमय नवनाथ कथा आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच ११ ते पहाटे ४ पर्यंत हरिजागर होणार असल्याची माहिती ही यावेळी देण्यात आली.या संगीतमय नवनाथ कथेसाठी वेरूळ कसाबखेडा, गल्लेबोरगाव, मंबापुर, पळसवाडी, आखातवाडा, चिंचोली, सराई, भडजी, यासह तालुक्यातील हजारो नाथ भक्तांची उपस्थिती राहणार आहे.




# संदीप काळे, डॉ.अभिजीत सोनवणे यांना पुरस्कार प्रदान

## भोकर सेवा समर्पणचा वर्धापनदिन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** पत्रकारिता क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल संदीप काळे तर सामाजिक सेवेचे कार्य करणारे डॉ.अभिजीत सोनवणे यांना येथील सेवा समर्पण परिवाराच्या वतीने रविवारी (ता. ३१)राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला आहे. शहरातील माऊली मंगल कार्यालयात सेवा समर्पण परिवाराचा पाचवा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षतानी ज्येष्ठ साहित्यिक प्रा.दत्ता भगत तर प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्यमंत्री कार्यालयाचे अवर सचिव राजेंद्र खंदारे, उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी, तहसीलदार सुरेश घोळवे, महंत उत्तम महाराज यांची उपस्थिती होती. प्रारंभी दीप प्रज्वलन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांच्या सत्कारानंतर प्रास्ताविक सेवा समर्पणचे अध्यक्ष राजूरेड्डी लोकावाड यांनी करून कार्याची माहिती दिली. मान्यवरांच्या हस्ते पत्रकार संदीप काळे व डॉ. अभिजीत सोनवणे यांना (अकरा हजार रुपये रोख )सन्मानपत्र शाल श्रीफळ देऊन गौरविण्यात आला. अवर सचिव राजेंद्र खंदारे उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेटी यांनी सेवा समर्पण च्या वतीने ग्रामीण भागात करण्यात आलेल्या कामामुळे अनेक गावांचा उत्साह वाढला व सामाजिक कार्य चांगले असल्याचे मत व्यक्त केले. प्रा.दत्ता भगत यांनी अध्यक्षीय समारोप केला. डॉ.उत्तम जाधव, प्रा.व्यंकट माने, पत्रकार बी.आर. पांचाळ यांच्यासह मान्यवर मंडळी उपस्थित होते. सूत्रसंचलन मीरा जोशी तर आभार प्राध्यापक उत्तम जाधव यांनी केले. कार्यकम यशस्वीतेसाठी सेवा समर्पण परिवाराचे सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.



# अनुपमा धनवेचे नवोदय परीक्षेत घवघवीत यश

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** बाजार सावंगी येथील स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज बाजार सावंगीची विद्यार्थिनी अनुपमा शामराव धनवे हिने जानेवारी 2024 मध्ये झालेल्या नवोदय प्रवेश परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले. सलग गेल्या 10 वर्षांपासून स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज बाजार सावंगीच्या विद्यार्थ्यांची दरवर्षी नवोदय परीक्षेत निवड होते. आजपर्यंत एकूण 17 विद्यार्थ्यांची स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज बाजार सावंगी येथून नवोदय विद्यालय कन्नड येथे निवड झालेली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांची निवड होणारी केवळ स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज बाजार सावंगी ही संपूर्ण तालुक्यातील एकमेव शाळा आहे. संपूर्ण खुलताबाद तालुक्यातून केवळ स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल स्कूलची विद्यार्थिनी अनुपमा शामराव धनवे हिची नवोदय विद्यालयात निवड झाल्यामुळे वर्गशिक्षक, ज्यांनी वर्षभर कठोर मेहनत घेतली असे श्री दांगोडे सर, शाळेचे संस्थापक श्री साळुंके सर, मुख्याध्यापिका श्रीमती साळुंके मॅडम तसेच सर्व शिक्षक वृंद यांच्यातर्फे अनुपमाचे अभिनंदन करण्यात आले.

# डोणगावमध्ये मागील चार महिन्यांत सहा तरुणांच्या आत्महत्या

## डोणगाव येथील युवकांना झाले तरी काय...!

आधुनिक केसरी न्यूज

**मेहकर :** एकीकडे मुलगा हवा लहान पारिवार ज्यात कित्येक लोकांनी एक मुलगा एक मुलगी असे सुखी पारिवार तर काहींनी त्याच्या पलीकडे एकच मुलगा किव्हा एकच मुलगी असे आपले परिवार करून ठेवलेले आहेत त्यावर खूप स्वप्न उमेद्दी असतात मात्र हेच युवा आत्मविघातक पाऊल उचलत सरळ आत्महत्या करत आहेत ज्यात पालक बदनामी होऊनये म्हणून सर्वकाही चुपचाप निपटून घेत आहेत मात्र आत्महत्या का होत आहेत याचा उलगडा होत नसल्याने इतर पालकांच्या मनात चिंतेचे वातावरण तयार झालेले असून यावर कोण बोलणार कोण या युवकांना समजवणार असे एक ना अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत.

डोणगाव मध्ये मागील 4 महिन्याच्या अंतरात येथील 6 युवकांनी गळफास लावून आत्महत्या केली विशेष म्हणजे सर्वच्या सर्व युवक चांगल्या व सुशिक्षित घरातले आणि स्वतःही चांगले शिक्षित अश्यात पूर्वीच सुशिक्षित घर म्हणजे "हम दो हमारे दो " किव्हा एकच



अपत्य असल्याने त्या साठी त्याचे पालक जीवाची रान करत पैसा प्रॉपर्टी जमा करून ठेवतात त्या आपल्या पाल्याला मोठ्या मोठ्या शाळेत टाकतात त्याला महागडी शिकवणी वर्ग लावून डॉक्टर, अभियंता, आय ई एस, आय पी एस, एम पी एस सी किव्हा मोठा बिजनेस मॅन बनवण्याची त्यांची इच्छा असते त्यावर अपेक्षा आपला पाल्य पूर्ण करू शकेल का त्याची तेव्हढी एपत आहे का हे न पाहता त्याला मात्र शिक्षणा साठी बाहेर, नंतर क्लासेस साठी बाहेर अश्यात त्यावर जसे पाहिजेत तसे लक्ष राहत नाही पालक घरी आल्यावर आपल्या मोबाईल मध्ये व्यस्त अश्यात संवेदना शून्य अश्या आपल्या लेकरा कडून त्यांना अपेक्षा असते आपण लावलेला पैसा त्याला परत मिळावा त्याच्या कडून त्यांना खूप मोठया उम्मेदी असतात मात्र असे सर्व असून सुद्धा शेवटी घडते विपरीतच ज्याने कित्येक पालक चिंतीत आहेत आपल्या पाल्याशी कसे संवाद साधावे त्यांना कसे बोलते करावे त्याच्या मनात कोठे काय काय चाललेले आहे ते बाहेर कसे काढावे असे अनेक प्रश्न आहेत मात्र त्या बद्दल कोणीही काहीही बोलायला तयार नसल्याने आत्महत्या आणि आमली पदार्थाच्या सेवनाने आजारी होऊन मृत्यू होण्याचे प्रमाण वाढत आहेत.

# मतदारांना धमकावण्याचे प्रकार आढळल्यास त्वरित माहिती द्या : निवडणूक निरीक्षक जाटव

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** चंद्रपूर लोकसभा मतदार संघासाठी आता एकूण 15 उमेदवार रिंगणात असून कुठेही मतदारांवर प्रत्यक्ष -अप्रत्यक्ष दबाव किंवा धमकाविण्याचे प्रकार आढळल्यास त्याची माहिती त्वरीत द्यावी, असे आवाहन सामान्य निवडणूक निरीक्षक लोकेशकुमार जाटव यांनी केले. राजकीय पक्ष व उमेदवारांच्या प्रतिनिधींना निवडणूक प्रक्रियेची माहिती देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात रविवारी आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी श्री. जाटव बोलत होते. बैठकीला निवडणूक खर्च निरीक्षक हेमंत हिंगोनिया, कायदा व सुव्यवस्था निवडणूक निरीक्षक सुजीत दास, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी व इतर अधिकारी आणि राजकीय पक्षांचे / उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी जाटव म्हणाले, जिल्ह्यात किंवा चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाच्या ज्या क्षेत्रात मतदारांवर दबाव टाकणे किंवा धमकाविण्याचे प्रकार निदर्शनास येत असतील, त्याची माहिती त्वरित कळवावी. जेणेकरून अशा क्षेत्रात पोलिसांसह अतिरिक्त मनुष्यबळाचे व्यवस्थापन करता येईल. तसेच धमकाविणा-यांवर कडक कारवाईसुध्दा केली जाईल. निवडणुकीच्या काळात नागरिकांना किंवा अन्य कोणालाही तक्रार करावयाची असल्यास सी-व्हीजील ॲपचा उपयोग करावा. या ॲपवर तक्रार आणि फोटो अपलोड केल्यास 100 मिनिटांमध्ये त्याचे निराकरण करता येते. निवडणुकीच्या संदर्भातील ऑनलाईन परवानगी करीता 'सुविधा' ॲप विकसीत करण्यात आले आहे. उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी सुविधा ॲपचा वापर करावा. ऑफलाईन परवानगीकरीता 'एक खिडकी' योजनासुध्दा उपलब्ध आहे, असे सामान्य निवडणूक निरीक्षक जाटव यांनी सांगितले. तर खर्च निरीक्षक हिंगोनिया म्हणाले, पूर्ण निवडणूक प्रक्रियेदरम्यान कोणताही उमेदवार, राजकीय पक्ष किंवा संघटन 10 हजार रुपयांपेक्षा जास्त रोख रकमेचा खर्च करू शकत नाही. यापेक्षा जास्त खर्च करावयाचा असल्यास ऑनलाईन किंवा धनादेशाद्वारे करता येईल. तसेच उमेदवारांनी आपल्या खर्चाच्या नोंदवह्या अतिशय अचूक भराव्यात. खर्चाच्या नोंदवहीची पडताळणी तीन वेळा करणे आवश्यक असून नोंदवहीत बाब निहाय खर्च रोज नमुद करावा, अशा सूचना श्री. हिंगोनिया यांनी दिल्या. सादरीकरण करताना जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, संपूर्ण निवडणूक प्रक्रिया निःष्पक्ष आणि मुक्त वातावरणात पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी सर्व राजकीय पक्ष, उमेदवारांचे सहकार्य आवश्यक आहे. आदर्श आचारसंहितेच्या काळात 'काय करावे' किंवा 'काय करू नये', यबाबतही त्यांनी माहिती दिली. सोबतच 27 मार्च रोजी अंतिम झालेली मतदार यादी, 85 वर्षावरील व दिव्यांग मतदारांना गृहमतदानाची सुविधा, टपाली मतदान, निवडणुकीसाठी पोलिस कर्मचा-यांची तैनाती व इतर मनुष्यबळ, जिल्हास्तरावर व विधानसभा मतदारसंघ स्तरावर मिळणा-या परवानग्या, ईव्हीएम व्हीव्हीपॅट सुरक्षा व्यवस्थापन, स्ट्राँग रुम, पेडन्यूज व जाहिरातींचे पूर्व प्रमाणीकरण, उमेदवारांच्या खर्चाचे योग्य व्यवस्थापन आदींबाबत उमेदवारांच्या प्रतिनिधींना अवगत केले.



# इंग्रजकालीन वटवृक्ष ठरले पर्यावरण संरक्षणासाठी पुरक

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** सावळीविहीर खुर्द परीसरात असलेल्या क्रुषी संशोधन केन्द्रालगत जी पाटबंधारे खात्याची पाण्याची जी चारी आहे त्या लगत इंग्रजांनी दूरदृष्टी ठेवुन शंभर वर्षांपूर्वीच्या वडाच्या झाडाची केलेली लागवड बघितल्यावर इंग्रजांनी देखील पर्यावरण संतुलित राहण्यासाठी किती दक्ष होते याचा प्रत्यय येतो.

आज या झाडाची वय शंभर वर्षापेक्षा जास्त असल्याने हि वडाच्या एका झाडाचा घेर दोन गुठ्ठे जागे इतका वाढला असल्याचे दिसून येते मोठमोठे वाढलेली झाडे बघितल्यावर वृक्षारोपणाचे महत्त्व किती मोठे आहे याचा प्रत्यय येतो इंग्रज जरी गेले तरी त्याच्या चागल्या कामाचा आदर्श घेतला पाहिजे.



इंग्रजांना जाऊन ७६ वर्ष झाले आहे व देशाला स्वातंत्र्य मिळून देखील तितका काळ लोटला असला तरी ज्या प्रमाणात आपल्या केन्द्र व राज्य सरकारला देखील जे वृक्षारोपणाचे काम करायला पाहिजे होते ते करता आले नाही व यश देखील मिळाले नाही अशी खंत विजय खरात या ग्रामस्थांने व्यक्त केली आहे इंग्रज कालिन वडाची झाडे मोठा परीसर थंडगार हवा वाहणारी पाण्याची चारी बघितल्यावर वृक्षारोपणाचे महत्त्व लक्षात येते बाभळेश्वर ते कोपरगाव या नगर मनमाड महामार्गावर मोठ्या प्रमाणावर दोन्ही बाजूला मोठ मोठी झाडे होती पण रस्ता रूद होऊन पंधरा वर्षे झाली तरी झाडे लावण्याचा पडलेला विसर या बाबत देखील खंत खरात यांनी व्यक्त केली आहे.

# अल्पवयीन मुलीचे लैंगिक शोषण

आधुनिक केसरी न्यूज



**नागपूर :** एका तरुणाने वस्तीतच राहणाऱ्या १५ वर्षीय मुलीला प्रेमाच्या जाळ्यात अडकवले. लग्नाचे आमिष दाखवून तिच्या घरात घुसून तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर गेल्या नऊ महिन्यांपासून मुलीचे लैंगिक शोषण सुरु होते. कुटुंबीयांना याबाबत कळल्यानंतर पोलिसांत तक्रार देण्यात आली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून तरुणाला अटक केली. ही घटना कोराडी पोलीस ठाण्यांतर्गत घडली. कृष्णा झनकलाल मच्छिरके (२६) रा. कोराडी, असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. जून २०२३ मध्ये १५ वर्षीय मुलीला कृष्णाने ओळखी करीत मैत्री करून घेतली. वस्तीतच राहणाऱ्या मुलीच्या घराकडे वारंवार चकरा मारून तिला प्रेमाच्या जाळ्यात अडकवले. घरी एकटा असताना त्याने मुलीला भेटण्यासाठी बोलावले. तेथे तिच्याशी अश्लील चाळे सुरू केले. तिने विरोध केला असता लग्नाचे आश्वासन दिले. त्यानंतर तिच्याशी लैंगिक संबंध प्रस्थापित केले. तेव्हापासून तो सतत मुलीचे लैंगिक शोषण करीत होता. दरम्यान मुलीच्या कुटुंबीयांना दोघांच्या संबंधाबाबत कळले. चौकशीत कृष्णाने बैगिक अत्याचार केल्याचे समोर आले. मुलीसह पोलीस स्टेशन गाठून कृष्णा विरुद्ध तक्रार करण्यात आली. पोलिसांनी लैंगिक अत्याचार आणि पोक्सो ॲक्टच्या कलमान्वये गुन्हा नोंदवून कृष्णाला अटक केली.



# साई नगरीत परराज्यातील महिलेचा व चिमुकलीचा पोटासाठी संघर्ष

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** गुरुवार दिनांक २८ मार्च रोजी रात्रीची वेळ शिर्डीचा झगमगाट रस्त्यांवर असलेली गर्दी फटाक्यांचा आवाज व एक मनोरुग्ण महिला वेगवेगळ्या प्रकारची चार ओझे व हातात चिमुकली मुलगी व तिच्या हातात गोणपाट व सराईत पणे पडलेल्या पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या गोळा करताना बघितल्यावर कोणत्याही माणसाला वेदनादायक असा क्षण होता पण पोटासाठी माय लेकीचा संघर्ष त्या कोण कुठल्या शिर्डी शहरात कशा आल्या याची उत्सुकता होती म्हणून चौकशी देखील केली मात्र महिलेने पकडलेले मौन बरेच काही सागुन जात होते महिलेचा पेहराव बघता ती परराज्यातील हिदी भाषिक राज्यातील असावी कारण शिर्डी शहरात वेगवेगळ्या राज्यातील रेल्वे साईनगर शिर्डी स्थानकावर येत असतात त्या रेल्वे मध्ये परराज्यातील मनोरुग्ण देखील कधी कधी बसुन दिले जातात व शेवटचे स्टेशन आले की त्याना उतरुन दिले जातात आणी मग त्याचे लगतच्या शहरात आगमन होत असते त्यास हि महिला देखील अपवाद नसावी मात्र शहरात वाढते मनोरुग्ण दिवसा व रात्री फिरताना दिसून येत आहे सेवाभावी संस्था देखील अशा लोकांवर उपचार देखील करत असतात मात्र वाढती संख्या हि डोकेदुखी ठरणारी बाब ठरत आहे हे मात्र नक्की असे असले तरी शिर्डी पोलीसा कडून देखील वेळोवेळी अशा मनोरुग्ण महिला व पुरूषाना अनाथ आश्रमात देखील दाखल करत असतात

# भोकर तालुक्यात राजकीय बैठकीचा सपाटा

## काँग्रेस व भाजपाची प्रतिष्ठा पणाला

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण नुकतेच भाजपावाशी झाल्याने राजकीय समीकरण बदलल आहे. दिल्ली गाठण्यासाठी तालुक्यात काँग्रेस व भाजपानी प्रचाराच्या निमित्ताने मित्रपक्षां समवेत बैठकीचा सपाटा सुरू केला आहे. दोन्ही पक्षाने हि निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे. मतदार राजा राजहंसाच्या भुमिकेत असुन एमआयएम,वंचितसह अन्य पक्षाचा कौल निर्णायक ठरणार आहे.

भोकर विधानसभा मतदारसंघ हा काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला होता आता माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण हे भाजपात प्रवेश केल्यानंतर समिकरण काहिस बदलल आहे.मागील लोकसभा निवडणुकीत ज्यांनी पराभव केला त्यांच्या विजयासाठी हातात हात घालून एकदिलान काम कराव लागत आहे. तालुक्यातील मतदार अशा धोरणामुळे अचंबित झाले आहेत.विशेषता दलीत, मुस्लिम मतदार उघडपणे विरोध करीत असल्याचे समजते. अशा परिस्थितीत अशोक चव्हाणांना मार्ग काढताना तारेवरची कसरत करावी लागते आहे. भाजपाचे उमेदवार प्रताप पाटील चिखलीकर यांनी गत पाच वर्षाच्या काळात विकासाच्या बाबतीत ठोस निर्णय घेतले नसुन जनसंपर्क ठेवला नाही याची मतदारात नाराजी आहे. पुन्हा त्यांनाच उमेदवारी बहाल करून त्याच्या विजयाची जबाबदारी अशोक चव्हाण यांच्यावर सोपवण्यात आल्याचे समजते.काही प्रमाणात असलेली नाराजी दूर करून त्यांना "राजी" करण्यासाठी अशोक चव्हाण घरभेटी,कोपरा बैठका,सभांच्या माध्यमातून मनपरिवर्तन करीत असल्याचे दिसून येत आहे. चव्हाण यांनी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी दिल्याने तालुक्यातील काँग्रेस पक्षाला गळती लागली आहे.जे टिकले त्यांनी पक्षाला सावरण्यासाठी सरसावल्याचे समजते.काग्रेस पक्षाकडून माजी आमदार बळवंतराव चव्हाण यांना लोकसभेची उमेदवारी देण्यात आली आहे.नायगाव मतदारसंघात त्याचे प्राबल्य आहे.भोकर विधानसभा मतदार संघ हा अशोक चव्हाण यांचा असल्याने बळवंतराव चव्हाणांना मते मिळवण्यासाठी मेहनत करावी लागणार आहे.या परिसरात नातेगोते आणि भाजपावर नाराज असलेले मतदार आणि दलीत मुस्लिम मते त्यांच्या गळाला लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.खरी लढत काँग्रेस व भाजपात असून याशिवाय एमआयएम, वंचित बहूजन आघाडीसह अन्य पक्षाची भुमिका निर्णयक ठरणार असल्याने सर्व राजकीय पक्षाच्या नजरा तिकडे लागून आहेत.



**सभा बैठकावर भर :** नांदेड लोकसभा निवडणूक जाहीर झाल्यापासून तालूक्यातील राजकीय घडामोडीला वेग आला आहे . ऊन्हाच्या तापमाना सोबतच राजकीय वातावरण अधीकच तापले आहे . काँग्रेस व भाजपानी तालुक्यात सभा,बैठकावर अधिक भर देवून मतदाराशी संवाद सादत असल्यायाचे दिसून येत आहे .किती उमेदवार रिंगणात असतील हे स्पष्ट झाल्यावर प्रचारात खरी रंगत भरणार आहे .

# कोपरगाव तालुक्यात १० किलो गांजासह तस्कर गजाआड

## अहमदनगर स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**रमेश भोंगळ**

**कोळपेवाडी :** अहमदनगर स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करीत कोपरगाव तालुक्यात १० किलो गांजासह तस्कर गजाआड केला आहे. त्यामुळे नगरहून पथक येऊन कार्यवाही करीत असेल तर स्थानिक पोलीस काय करतात? असा प्रश्न नागरिकांनी विचारला आहे.

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने अहमदनगर पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी पो.नि.दिनेश आहेर, स्थानिक गुन्हे शाखा, अहमदनगर यांना अहमदनगर जिल्ह्यातील अवैध धंद्याची माहिती काढुन त्यांचेविरुध्द कारवाई करणेबाबत आदेशीत केले होते. पथक कोपरगांव पोलीस स्टेशन हद्दीत अवैध धंद्दे करणा-या इसमांची माहिती काढत असतांना स.पो.नि.हेमंत थोरात यांना प्रदीप बाजीराव पायमोडे रा.मंजुर, ता.कोपरगांव हा कब्जात गांजा बाळगुन त्याचे राहते घरी विक्री करतो अशी गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानंतर पथकाने तात्काळ कोपरगांव तालुका पोलीस स्टेशन येथे जावुन पो.नि.संदीप कोळी, कर्मचारी, पंच व साधने सोबत घेवुन छाप्याचे नियोजन केले.

पथकाने लागलीच बातमीतील नमुद ठिकाणी संशयीत नामे प्रदीप पायमोडे याची वास्तव्याबाबत माहिती घेवुन, त्याचे घराची पंचा समक्ष झडती घेता त्याचे घरातील कॉटवर पिवळ्या रंगाच्या गोणीत उग्र वास येत असलेला बिया बोंडे, काड्या पाने संलग्न असलेला पाला मिळुन आला. पथकाने या बाबत विचारणा करता त्याने पिवळ्या रंगाच्या गोणीत बिया बोंडे, काड्या पाने संलग्न असलेला पाला हा गांजा असुन विक्रीसाठी आणल्याचे सांगितल्याने आरोपी प्रदीप बाजीराव पायमोडे वय ३२ रा. मंजुर, ता. कोपरगांव याचे घरातील लोखंडी कॉटवर पिवळ्या रंगाच्या गोणीत ठेवलेला १,०६,१५० रुपये किंमतीचा १० किलो ७३२ ग्रॅम वजनाचा अंमली पदार्थ गांजा मिळुन आल्याने तो हस्तगत करुन सदर बाबत आरोपी विरुध्द पो.कॉ.बाळासाहेब गुंजाळ स्था.गु.शा यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कोपरगांव तालुका पोलीस स्टेशन गु.र.नं. ११५/२०२४ गुंगीकारक औषधीद्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ कायदा सन १९८५ चे कलम ८ (क), २० (ब) II प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास कोपरगांव तालुका पो.स्टे. हे करीत आहे.

सदरची कारवाई राकेश ओला पोलीस अधीक्षक, अहमदनगर व वैभव कलुबर्मे, अपर पोलीस अधीक्षक शिरीष वमने, उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी विभाग यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. दिनेश आहेर, स.पो.नि हेमंत थोरात व अंमलदार बाळासाहेब मुळीक, संतोष खैरे, बाळासाहेब गुंजाळ, उमाकांत गावडे व मपोकॉ प्रियंका चेमटे यांच्या पथकाने केली आहे.

वरिष्ठ कार्यालयाने संबंधित पोलीस स्टेशनच्या हद्दीत अवैध धंद्यावर कारवाई केल्यास ठाणे प्रमुखांना कारणे दाखवा नोटीस अधिक्षक राकेश ओला बजावणार का? असा प्रश्न नागरिक विचारत आहे. वाळु, गांजा, मटका गुटखा, बिंगो लाँटरी, हातभट्टी, गावठी दारू सोरट या व्यवसायाने तालुक्यातील पश्चिम भागातील बाजार पेठेच्या सुरेगाव, चासनळी भागात चांगलेच बस्तान बसवल्याने गुन्हेगारी मध्ये वाढ होवून नागरिकांना चोरट्यांचा जाचाला सामोरे जावे लागत आहे.

# निकृष्ट रस्ता कामाबद्दल नागरिकांच्या तक्रारी

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी महसूल मंडळ मध्ये सद्या रस्ते खडीकरण डांबरीकरण मजबुतीकरण व पुलकामांना वेग आले असुण कामाबद्दल नागरिक सतत तक्रार करत असताना विभाग कारवाई करण्याऐवजी बघ्याची भूमिका घेत असुण व नागरिकांना समज देत विभाग अंदाज पत्रकाप्रमाणे काम करून घेईल असे आश्वासन देत वेळ मारुन नेत असल्याचे चित्र आहे.

तालुक्यातील टाकळी राजेराय फाटा ते लामणगाव सदर काम कित्तेक वर्षानंतर सतत बातम्या द्वारे विभागाला अवगत करुन कोटी रुपये खर्च करून होत आहे.मात्र विभागाचा शाखाभियंता उपाभियंता याकडे दुर्लक्ष करून आहे. कामात चालढकल सोडधर निकृष्ट दर्जाहिन काम होत असल्याची तक्रारी असताना व काम बंद करण्याची पाळी आली असताना" मी मारल्या सारखं करतो तु रडल्या सारखं कर "असी स्थीती काम पुर्ण करण्यात आले आहे. रस्ता डांबरीकरण मजबुतीकरण कामात डांबरात डांबरटपणा दिसून येत आहे. पुढेपाठ मागे सरसपाट असा रस्ता म्हणजे डांबरी खडी उधळून जात आहे.व यावर कोटी रुपयांचे खर्च होत आहे. तीच स्थीती शेख पूर -सावंगी रस्त्याची आहे.मातीकरण खडीकरण डांबरीकरण मजबुतीकरण असे कामाचे स्वरूप असुन मातीकरण खडीकरण कामात पाणी टाकून दबाईचा अभाव दिसून येतो आहे यासंदर्भात नागरिकांनी विभागाच्या उपभियंता उपविभागीय कार्यालय व कार्यकारी अभियंता अधिकारी , पर्यंत लेखी तोंडी तक्रार करुनही दाखल घेतल्या जात नाही. कर्मचारी अधिकारी घटनास्थळी पोहचण्या पुर्वीच काम थातुरमातुर काम पुर्ण करण्यात येत आहे.तीच स्थीती सावंगी ताजनापूर रस्त्याची आहे. तक्रारी करुन काम बंद करूनही ये रे माझ्या मागच्या...प्रमाणे मार्च इन्ड व निवडणूक बघता कामे अटोपती घेण्यात येत आहे.ठेकेदारावर कुणाचा वचक आहे की नाही. अंदाजपत्रकाऐवजी मनमानी करत कामे होत आहे व अधिकारी कर्मचारी हतबल दिसून येत आहे. त्यांच्याकडे एकच वाक्य आहे. आपण अंदाज पत्रकाप्रमाणे कामे करुन घेवु.मात्र काम मनमानी पणे सुरु आहे.वरिष्ठा कडे तक्रार करूनही दखल घेतल्या जात नाही. जिल्हाधिकारी यांनी स्वतः लक्ष घालून समिती स्थापन करुन तालुक्यातील सर्व कामांची पाहणी चौकशी करून दोषींवर कारवाई करावी व तो पर्यंत बील अदा करु नये अशी मागणी नागरिकांतून होत आहे.



# प्रा. टी. सी. खोटरे बसपाकडून दिंडोरी लोकसभा निवडणूक लढवणार

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** बहुजन समाज पार्टी बसपाकडून उच्च शिक्षित प्रा. टी. सी. खोटरे यांना अनुसूचित जमाती(एस. टी.) राखीव दिंडोरी लोकसभेला उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

बसपाचे प्रदेश महा. सचिव इंजि. तायडे साहेब, जिल्हा अध्यक्ष मा. काळे साहेब, प्रभारी मा.प्रा.पाटील साहेब, मा. लालचंद साहेब, मा. मछिंद्र आहेर साहेब,विनोद पवार, अनिल गावित, मुकेश पांडवी व बसपा जिल्हा कार्यकारणी चे प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. बहुजन समाज पार्टी महाराष्ट्रात स्वतंत्र स्वबळावर लोकसभा लढवीत आहे,

प्रा. खोटरे हे विध्यार्थी असताना इस.एफ. वाय स्टुडन्ट फेडरेशन ऑफ इंडिया या विध्यार्थी चळवळीत पासून सक्रिय कार्यकर्ते होते,पुढे भारताचा युवा महासंघ या युवक चळवळीत सामील झाले, त्यानंतर ते भारतीय आदिवासी पँथर चे अध्यक्ष प्रशांत बोडखे यांच्याबरोबर मराठवाडा परिसरात पँथर चे काम केले आहे, तसेच बिरसा-आंबेडकर- फुले-शाहू या सामाजिक संघटना, आदिवासी बचाव अभियान,ते शासकीय विद्यानिकेत औरंगाबाद येथील माजी विध्यार्थी असून शेतकरी संघटना आदी संघटनेत त्यांनी अग्रेसर भूमिका घेऊन अभ्यासपूर्वक लढा देऊन जनहिताची कामे केली आहेत,

याची दखल घेऊन संकल्प आदी युवा संघटनेने त्यांना महाराष्ट्र युवा गौरव पुरस्कार देण्यात आला होता,प्रा. खोटरे यांनी पांगारणे, उंबठाण, सुरगाणा, कळवण,सटाणा, नासिक,संभाजीनगर( औरंगाबाद ) आदी ठिकाणी पँथर संघटनेच्या वतीने महत्वपूर्ण आंदोलन करून सर्वसामान्य, शेतकरी,आदिवासी, बहुजन वंचित, पीडित लोकांना संविधानिक न्याय मिळावे या करिता सातत्याने संघर्ष करीत आहेत, आपण शेतकऱ्यांच्या कांदा, टोमॅटो, वरी, नागली सफेद मुसली, आदी शेतीमाला पूरक हमीभाव मिळावा, कांदा या पिकावरील निर्यात बंदी तात्काळ उठवावी, पीक कर्ज माफ करावे, आदिवासी समाजात बोगस घुसखोरी थाबवावी, पेसा कायदेची पारदर्शी अंमलबजावणी करावी, जुनी पेंशन लागू करावी, आदिवासी विकास विभागातील विविध योजनेतून होणारे भ्रष्टाचारावर नियंत्र ठेवणे, शिक्षण, आरोग्य, रस्ते पाणी टंचाई, महिलांचे आरोग्य, बेरोजगार युवकांना रोजगार, रोजनदारी कर्मचारी यांना सरकारी सेवेत कायम करावे, खाजगीकरण बंद करावे, एसी, एसटी, ओबीसी यांचे संविधानिक हक्क अबाधित राहावे,आदिवासी करिता पाचवी व सहावी अनुसूची लागू करावी,मराठ्यांना टिकणारे आरक्षण दयावे, अल्पसंख्यांक मुस्लिम बांधवाना आरक्षण मिळावे, दिंडोरी लोकसभा भागात नवीन उदयोग व्यवसाय चालू करणे, ड घरकुल, शबरी घरकुल, रमाई आवास आदी प्रमुख विषयांना आपण प्राधान्य देणार असे त्यांनी सांगितले. ऑक्टोबर 2023 मद्ये त्यांनी तब्ब्ल एकोणीस दिवस सर्वसामान्य जनतेच्या हक्काकरिता तहसील कार्यालय, सुरगाणा येथे बेमुदत आंदोलन केले होते, त्याची दखल उलगुलान आदिवासी महामोर्चा ने नाशिक येथे माजी खा. मा. हरिश्चंद्र चव्हाण साहेब, लोकनेते कॉ. जे. पी. गावित साहेब, आमदार झिरवाळ साहेब, आमदार नितीन पवार साहेब, आमदार खोसकर साहेब, प्रा. बागुल सर, राम चौरे, रतन चौधरी, लकी जाधव, पंकज ठाकरे, देवा वाटणे तसेच आदिवासी विविध संघटनानी अभिनंदन केले होते. बसपा या राष्टीय पार्टी कडून त्यांनी यापूर्वी कळवण-सुरगाणा विधानसभा लढविली होती मतदारांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता, त्यांच्या या उमेदवारिमूळे इतर पक्षाकडून उमेदवारी करणाऱ्या उमदेवारांना डोकेदुखी होणारच, यात शंका नाही.

# मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी ‘बूथलेव्हल मॅनेजमेंट’ : जिल्हाधिकारी गौडा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक – 2024 करीता



जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज असून आगामी निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी ‘बुथ लेव्हल मॅनेजमेंट’ चे नियोजन करण्यात आले आहे, असे प्रतिपादन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले. नियोजन सभागृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी उपस्थित होते.

2019 च्या चंद्रपूर लोकसभा निवडणुकीमध्ये एकूण 64.84 टक्के मतदान झाले होते, असे सांगून जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, चंद्रपूर शहरात मतदानाची टक्केवारी कमी होती. शहरातील काही मतदान केंद्रावर तर 50 टक्क्यांपेक्षाही कमी मतदान झाले. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यावर प्रशासनाचा भर आहे. ज्या मतदान केंद्रावर 50 टक्क्यांपेक्षा कमी मतदान झाले, अशा भागात विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. तसेच ‘बुथ लेव्हल मॅनेजमेंट’ अंतर्गत मतदारांना केंद्रावर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. यात उन्हाचा तडाखा बसू नये म्हणून मंडप उभारणे, जेणेकरून मतदारांना सावली मिळेल, पिण्याचे पाणी, प्रत्येक मतदान केंद्रावर दिव्यांग मतदारांसाठी व्हीलचेअरची व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच 85 वर्षांवरील मतदार, गर्भवती माता, स्तनदा माता यांना मतदानासाठी प्राधान्य देण्यात येईल. या मतदारांना रांगेत उभे राहण्याची आवश्यकता नाही. यासोबतच चंद्रपूर लोकसभा मतदार संघातील सहाही विधानसभा मतदारसंघात दिव्यांग व्यवस्थापित मतदान केंद्र, महिला व्यवस्थापित मतदान केंद्र, युवा मतदान केंद्र, आणि आदर्श मतदान केंद्राचे नियोजन करण्यात येणार आहे. निवडणूक संदर्भात काही संशयास्पद बातमी किंवा व्हीडीओ क्लिप



आढळली तर त्याची खात्री करावी व प्रशासनाशी संपर्क करावा. चुकीची बातमी आपल्याकडून जाणार नाही, याबाबत सर्वांनी दक्षता घ्यावी. निवडणुकीसंदर्भात सर्व परवानग्या मिळण्यासाठी जिल्हास्तरावर तसेच विधानसभा मतदारसंघ स्तरावर ‘एक खिडकी’ कार्यान्वित करण्यात आली आहे. तसेच ऑनलाईन परवानगी सुध्दा घेता येणार आहे, असेही जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी सांगितले. चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाचा निवडणूक विषयक तपशील : 27 मार्च 2024 अखेर चंद्रपूर लोकसभा मतदार संघात एकूण 18 लक्ष 37 हजार 907 मतदार असून यापैकी 9 लक्ष 45 हजार 736 पुरुष मतदार, 8 लक्ष 92 हजार 122 स्त्री आणि 48 इतर मतदार आहेत. मतदान केंद्रांची एकूण संख्या 2118 आहे. चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात 18 ते 19 वयोगटातील युवा मतदारांची संख्या 24443 आहे. तसेच 85 वर्षांपेक्षा जास्त वय असलेले मतदार 16442 असून दिव्यांग मतदारांची संख्या 9694 आहे. 19 मार्च 2024 रोजी झालेल्या प्रथमस्तरीय तपासणी अंती 2118 मतदान केंद्रावर 2610 बॅलेट युनीट, 2610 कंट्राल युनीट आणि 2818 व्हीव्हीपॅटचे वाटप करण्यात आले आहे.

# ज्येष्ठ लेखिका सुलेखा शिंदे यांना आदरांजली

आधुनिक केसरी न्यूज



**सुशिल गायकवाड**

**तरडगाव :** फलटण येथील संवेदनशील मनाच्या, साहित्यातून स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या, वात्सल्यमूर्ती, प्रेमाचा सागर, आभाळाची माया असणाऱ्या, प्रतिकूल परिस्थितीवर मात करून दिलखुलास आयुष्यभर साहित्य व सामाजिक चळवळ करणाऱ्या लेखिका स्व. सुलेखा शिंदे यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी साहित्यप्रेमी सेवाभावी फाऊंडेशन फलटण, वन विभाग फलटण व महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा फलटण यांच्या संयुक्त विद्यमाने साहित्यिक संवाद फलटण कार्यक्रमाच्या वतीने नाना नानी पार्क फलटण येथे शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा फलटणचे अध्यक्ष रविंद्र बेडकीहाळ, संयोजक व माणदेशी साहित्यिक ताराचंद्र आवळे, माजी प्राचार्य रविंद्र येवले, प्रा.विक्रम आपटे, प्रा सुधीर इंगळे, प्रा डॉ अशोक शिंदे रानकवी राहुल निकम, कवयित्री आशा दळवी, महादेव गुंजवटे, बाळकृष्ण कांबळे,ॲड.रोहिणी भंडलकर, ॲड. आकाश आढाव, श्रेयस कांबळे, अलका बेडकीहाळ, विकास शिंदे यांनी स्व. सुलेखा शिंदे यांना श्रद्धांजली अर्पण करून आठवणी जागवल्या.त्यांचा साहित्य प्रवास तसेच लेखकाचे घर पेलताना त्यांनी करावी लागणारी कसरत. साखर शाळेच्या पहिल्या शिक्षिका तसेच प्रौढ साक्षरता यासाठी त्यांनी दिलेले अविस्मरणीय योगदान. पैशापेक्षा माणसे जपली व माणसांची साखळी निर्माण केली. साहित्यात चिंतन असणाऱ्या, नव साहित्यिकांना त्या मार्गदर्शक व प्रेरणास्रोत होत्या त्यांच्या निधनाने साहित्य क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. मातृत्वाचा वसा घेतलेल्या त्या आगळ्यावेगळ्या माता, लेखिका व वात्सल्याचा ठेवा होत्या. साहित्यिक संवादांमध्ये त्या भरभरून बोलायच्या, जाणून घ्यायच्या,चर्चा करायच्या, मार्गदर्शन करायच्या त्यामुळे त्या कायम स्मरणात राहतील.त्यांचे स्मरणार्थ त्यांनी लिहलेली कादंबरी व नव कवींच्या कवितांचा प्रातिनिधिक काव्यसंग्रह काढण्याचे ठरले. प्रकाशनासाठी संयोजक ताराचंद्र आवळे व महादेव गुंजवटे यांनी जबाबदारी घेतली तर मी सुलेखा बोलतेय हे पुस्तक ज्येष्ठ साहित्यिक सुरेश शिंदे यांनी लिहिण्याचे अभिवचन दिले. हिच खरी आदरांजली ठरणार आहे.यावेळी ज्येष्ठ साहित्यिक सुरेश शिंदे, मोहनराव फुले, अर्चना गुंजवटे,ऍड प्रकाश शिंदे ,विनायक ननावरे, सुरेश भगत, मुकुंद मोरे, दामिनी ठिगळे,अस्मिता खोपडे, सचिन जाधव, हरिराम पवार, राजेश पवार तसेच शिंदे कुटुंबीयांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या निधनाने साहित्य क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# नाथराव म्हणजे अखंड ऊर्जास्रोत : पं. तळवलकर

## सुरेल बंदिशींनी नाथस्वर महोत्सव संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** रसिकांच्या मनाशी षड्ज पंचमने संवाद साधत गायनाचार्य स्व. पंडित नाथराव नेरळकर यांच्या स्मरणार्थ त्यांच्या शिष्यांनी नाथस्वर महोत्सव संपन्न केला.
29 मार्च रोजी तापडिया रंगमंदिरात झालेल्या या स्वरोत्सवाचे उद्घाटन तालमार्तंड पं. सुरेश तळवलकर यांच्या हस्ते झाले. या मैफलीत सुरुवातीला षड्ज पंचम संवादात राग मधुकंस व चंद्रकंस एकाच वेळी सादर करत अंकिता जोशी व कृष्णा बोंगाणे यांनी 'जसरंगी' हा मूर्च्छना भेदावर आधारित पं. जसराज यांनी तयार केलेला गायन प्रकार सादर केला. झपतालातील "राधा मानो हरी रसिली चित चोरी, श्याम मनोहर के हियमे सदा बिराजे" ही बंदिश अत्यंत चमत्कृतीपूर्ण आविष्कार करत भावनिक साददेखील रसिकांना घातली. त्यानंतर पं. नाथराव नेरळकर यांची "काहे सतावो मोहें श्याम.." ही तीनतालातील रचना सादर केली. एकाच वेळी दोन स्वरांत दोन राग सादर करत त्यात आलापी आणि तानांचे द्वंद्व सादर करत आनंदाच्या परमोच्च स्थानी नेऊन ठेवले. पण अभंग झाला नाही तर मैफिलीचा गोडवा अपूर्णच राहणार म्हणून रसिकांच्या आग्रहास्तव "गोविंद दामोदर माधवेती" हा अभंग सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांना हार्मोनियमची साथ अभिषेक शिणकर व यश खडके यांनी केली तर तबल्याची संगत सागर पाटोकार व आशय कुलकर्णी यांनी केली. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात सुरवातीला तालमार्तंड पं. सुरेशजी तळवलकर यांनी स्व. पं. नाथराव नेरळकर यांना शाब्दिक आदरांजली वाहत "नाथराव म्हणजे ऊर्जेचा स्रोत होते. त्यांच्याकडून मला सतत प्रेरणा मिळत असे. त्यांना मी सतत हसत आणि उत्साहाने भरलेलं बघितले आहे" अशा भावना व्यक्त केल्या.
सादरीकरणाच्या सुरवातीला त्यांनी झपतालात वंदना सादर केली. त्यानंतर आडा चौतालात सोहनी रागात "चलो हटो पिया अपनी झुटीं बचन हमे ना सुनाओ" ही बंदिश घेतली त्यात आलापी, बोल बनाव, उपज अंगाने तबल्याच्या बोलांचे पठण, विविध लयकारी, तिहाया घेत घेत समेवर येणे संपूर्ण सांभागृहाला दाद द्यायला भाग पाडत होते. कथ्थक नर्तकांच्या घुंगरातून निघणारे बोल रसिकांच्या अंगावर शहारे आणत होते. मध्येच ड्रमसेट, कलाबास, केजोन, पखवाज, तबला व हार्मोनियम यांची जुगलबंदी मैफिलीत चैतन्य निर्माण करत होती. मध्येच गायली जाणारी आलापी मनाला शांतता देत होती. एकाच मैफिलीत नवरसांचा वर्षाव रसिक अनुभवत होते.
पंडिजींनी तबल्याला हात न लावता सर्व गायक, सर्व वादक व नर्तक यांच्याकडून संगीताची प्रत्यक्ष अनुभूती रसिकांना करवून दिली. सर्व कलाकारांची



पंडितजींच्या प्रति नम्रता व आदरभाव सर्व रसिक प्रत्यक्ष अनुभवत होते. देहभान विसरून सर्व जण या मैफलीत एकाग्र झालेले होते. अशा या स्वर्गीय सुखाची अनुभूती देणाऱ्या मैफलीची सांगता चंद्रकंस रागातील तीनतालातील "डिम डिम डम डम डमरू बाजे" या त्यांच्या प्रसिद्ध बंदिशीने केली. स्वर तालाच्या अमूर्त कल्पनांना रसिक नृत्याच्या माध्यमातून मूर्त स्वरूपात पाहत होते. पंडितजींसह सर्व कलाकारांना रसिकांनी उभे राहून अभिवादन केले. पंडितजींसोबत गायनाची साथ नागेश आडगावकर व विनय रामदासन, संवादिनी साथ अभिषेक शिणकर. तबला साथ सावनी तळवलकर, आशय कुलकर्णी, ड्रम साथ अभिषेक भुरुक, केजोनची साथ ईशान परांजपे, पखवाजची साथ रोहित खवळे, कलाबाश वाद्याची साथ ऋतुराज हिंगे यांनी केली. निखिल परिहार यांनी कथक सादर केले. नाथ शिष्य परिवाराच्या वतीने हेमा उपासनी नेरळकर यांनी आभार मानले.

# डोणगावमध्ये रेती माफियांचा बोलबाला

## रात्री होते रेतीची तस्करी; महसूल विभाग झोपेत असतो तर जागे राहणारे विभाग करतात कमाई

आधुनिक केसरी न्यूज



**मेहकर :** तालुका हा भौगोलिक दृष्टीने खूप मोठा आहे मात्र सध्या हया तालुक्यात रेती फक्त श्रीमंतांची होऊन गेलेली आहे असे दिसून येते ऑर्डर करा रात्री रेती मिळून जाईल गरीब फक्त रेती कडे पाहुच शकतो घेवू शकत नाही पूर्णाची रेती 10 हजार रुपये ब्रास विकली जात आहे विशेष म्हणजे रात्री 2 ते सकाळी 5 वाजता दरम्यान ही रेती तस्कर घरपोच आणून देतात तेव्हा महसूल विभाग झोपलेला असतो तर जागी असणारा विभाग यावर आपली नजर ठेऊन ठरवून घेतलेल्या हिशोबाने काम करत आहे विशेष म्हणजे सेवा देण्याचे शुल्क ठरलेले असून त्या नुसार सर्व कामे होत आहेत.

सध्या मागील काही दिवसा पासून डोणगाव व परिसरात मोठ मोठी कामे सुरु असून त्याला रेतीचा नियमित पुरवठा सुरु आहे तर कित्येक गरिबांचे घरकुल रेती अभावी रडखडलेले असून त्यांना रेती मिळत नाही अश्याने गोरगरीब जनतेचा शासना वरून विश्वास उडून गेला एकीकडे शासनाने डिसेंबर 2021 मध्ये शासन निर्णय घेऊन घरकुल लाभार्थी साठी 5 ब्रास रेती रॉयल्टी मोफत देणार अशी घोषणा केली होती ज्याने घरकुल बांधणाऱ्या गरिबांच्या आशा पल्लवीत झाल्या होत्या मात्र शासनाचा तो आदेश फक्त कागदावरच असल्याचा दिसून येत आहे गरिबांच्या घरकुला साठी फुकटची तर दूरच राहिली विकतची सुद्धा रेती मिळेना जी रेती मिळत आहे तीला 7 ब्रासच्या टिप्पर साठी 70 हजार रुपये तर एक ब्रास रेती साठी 10 हजार रुपये मोजावे लागत आहेत.

मुंबई नागपूर राज्य महामार्गा वरून दररोज रात्री 12 ते सकाळी 5 दरम्यान रेती वाहतूक होते त्या वेळी महसूल विभाग झोपलेला असतो जागी राहणारा विभाग चोरावर नजर ठेवणे सोडून रेतीवर नजर खिळवून राहतो नजराणा मिळाला की तुमचे तुम्ही चालू द्या असा प्रकार सुरु असल्याने रेतीचा लिलाव होण्या अगोदरच रेती तस्कर गब्बर होतं आहेत यावर महसूल विभागाने नजर ठेऊन जप्त केलेली रेती तरी गरीब घरकुल धारकांस द्यावी अशी मागणी होतं आहे या रेतीची तस्करी करणारे सध्या डोणगाव मध्ये फोफावले ले असून यावर महसूल विभागाची मेहेर नजर तर आहेच पण पोलीस विभागाची विशेष मेहरबानी आहे. रेतीसाठी अत्ता वेगळी शक्कल लढवली जात आहे तापीची रेती असल्याचे दाखवून सध्या पूर्णाची रेती वाहतूक होत असून या मध्ये कित्येकांचे हात धुतले जात आहेत तर काहींनी रेतीची कमाई पाहता आपलेच साम्राज्य उभे करून टाकले ज्यावर महसूल बिभाग सुद्धा कोणतीही कार्यवाही करू शकत नाही याला पाहता रेती विकणारे एजंट आपल्या व्हाट्सअप स्टेटसवर रेतीचे दर सोबतच टिप्परचा फोटो ठेवून "रेती माफिया को पकडणा मुश्किल ही नही नामुनकीन है !

# बागेश्वर धाम बाबाविरुद्ध गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** बागेश्वर धाम बाबा त्यांच्या आक्षेपार्ह विधानामुळे ते पुन्हा एकदा वादात सापडले आहेत. मानव धर्माचें संस्थापक जूमदेव ठूब्रिकर यांच्या विरुध्द केलेले वादग्रस्त विधान धीरेंद्र शास्त्री अर्थात बागेश्वर बाबा यांना चांगलेच भोवले असून अखेर त्यांच्या विरोधात मोहाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सूरजलाल अंबुले यांच्या तक्रारीवरून धीरेंद्र शास्त्रींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अटक करण्याची देखील मागणी करण्यात येत आहे. भंडारा जिल्ह्याच्या मोहाडी शहरात धीरेंद्र शास्त्री म्हणजे बागेश्वर बाबा यांचा दिव्य दरबार २७ मार्चपासून २ एप्रिलपर्यंत चंदू बाबा स्टेडियम येथे आयोजित करण्यात आला आहे. यावेळी त्यांनी मानवधर्माचे संस्थापक जूमदेव ठूब्रिकर यांच्याविरुध्द आक्षेपार्ह विधान करत टीका केली. भंडारा गोंदिया जिल्हयातील आणि विविध पोलीस ठाण्यांत धीरेंद्र शास्त्रींविरूद्ध तक्रार दाखल करण्यात आली आहे. मात्र आतापर्यंत फक्त मोहाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून अजूनही कुठली कारवाही झाली नसल्याने हजारोच्या संख्येनं अनुयायांनी भंडारा तुमसर मार्ग बंद करत पोलीस ठाण्यासमोरचा मार्गही बंद केला. सत्संग मध्ये मानव धर्माचें संस्थापक जूमदेव ठूब्रिकर आणि त्यांच्या एका सेवकाबद्दल आक्षेपार्ह विधान केले आहे. त्यामुळे तेथील बाबा जुमदेव महाराज यांचे भक्त संतापले आहेत. बाबा जमुदेव महाराजांना मानणाऱ्या भाविकांनी बागेश्वर बाबांच्या विरोधात पोलिसात तक्रार देखील दाखल केली आहे. तसेच बागेश्वर बाबाला लवकरात लवकर अटक करावी, अशी मागणी देखील भक्तांकडून केली जात आहे. बागेश्वर धाम बाबा यांच्या वक्तव्याने लाखो सेवकांचे मन दुखावल्याने भंडारा ,गोंदिया, नागपूर जिल्हयातील विविध पोलिस स्टेशन येथे धीरेंद्र शास्त्री यांच्या विरूद्ध तक्रार दाखल करण्यात आली आहे.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# नक्षल्यांचा घातपाताचा डाव उधळला

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात सक्रिय झालेल्या नक्षल्यांचा घातपात घडवून आणण्याचा डाव उधळून लावत गडचिरोली पोलिसांनी त्यांचा तळ उध्वस्त केला आहे. एटापल्ली व धानोरा तालुक्याच्या शेवटच्या टोकावर छत्तीसगड सीमेलगतच्या टेकडीवर नक्षल्यांनी तळ बनवला होता. पोलीस कारवाईची कुणकुण लागताच नक्षलवाद्यांनी पळ काढला. यावेळी परिसरातून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा व साहित्य जप्त केले. लोकसभा निवडणुकीत घातपात घडविण्याच्या उद्देश्याने एटापल्ली आणि भामरागड तालुक्याला लागून असलेल्या छत्तीसगड सीमाभागात जवळपास दहा ते बारा जहाल नक्षलवादी सक्रिय झाले आहे. काही दिवसांपूर्वी रेपनपल्ली हद्दीत झालेल्या चकमकीत पोलिसांनी चार नक्षल्यांना कंठस्नान घातले होते. गुरुवारीदेखील छत्तीसगड सीमेवर मध्यरात्री सहा तास चकमक झाली. यानंतर २९ मार्चला पहाटे अहेरी तालुक्यातील अतिदुर्गम दामरंचा येथे अशोक तलांडी या आदिवासी तरुणाचा ताडगावजवळ गळा आवळून हत्या करत नक्षल्यांनी पत्रक टाकले होते. दरम्यान, पेंढरीपासून १२ किलोमीटरवर पूर्वेला छत्तीसगडच्या मानपूर जिल्ह्यातील चुटीनटोला गावाजवळ ४५० मीटर उंच पहाडीवर नक्षलवादी तळ ठोकून असल्याची गोपनीय माहिती मिळताच पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी ३० मार्च रोजी नक्षलविरोधी अभियान गतिमान केले. अपर अधीक्षक यतीश देशमुख यांच्या नेतृत्वाखाली सी- ६० जवानांनी अतिशय खडतरपणे ही अवघड पहाडी पार करून नक्षल्यांचा तळ उध्वस्त केला. पोलिसांचा आक्रमक पवित्रा बघून नक्षल्यांनी पळ काढला. कॉर्डेक्स वायर, डिटोनेटर, जिलेटिन स्टिक्स, बॅटरी, वॉकी टॉकी चार्जर, बॅकपॅक असे साहित्य जप्त केले आहे.